रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक १७२ ▌पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मतदानाची शेवटची वेळ बदलली

**मुंबई :** नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. या निवडणुकांसाठी १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची उपलब्धता करण्यात आली आहे. राज्यातील २४६ नगरपरिषदा तर ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. २ डिसेंबरला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असणार आहे.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹


## भाजप कार्यकर्त्याच्या घरात पैशांची बॅग

**मालवण :** शिवसेना (शिंदे) आमदार निलेश राणे यांनी मालवणमधील एका भाजपाच्या पदाधिकाऱ्याच्या घरी जाऊन स्टिंग ऑपरेशन केलं. यावेळी संबंधित भाजपा पदाधिकाऱ्याच्या घरात पैशांनी भरलेली एक बॅग आढळून आल्याचा आरोप निलेश राणे यांनी केला आहे. या संदर्भात निलेश राणे यांनी त्यांच्या सोशल मीडियावर लाईव्ह देखील केले आणि या लाईव्हमध्ये त्यांनी भाजपावर गंभीर आरोप केले. एखाद्याच्या घरात थेट बेडरूमपर्यंत जाऊन अशा प्रकारचं स्टिंग ऑपरेशन करणं योग्य आहे का?, असा सवाल चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला.

### वेधक

## भारतीय शेअर बाजारात तेजी

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात या आठवड्याच्या सुरुवातीपासून निर्देशांकांनी उसळी घेतल्याचे पाहायला मिळत आहे. आज (गुरुवारी) त्यात आणखी तेजी आल्याने शेअर बाजाराने नवीन विक्रमी उच्चांक गाठला आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास सेन्सेक्सने ८५,७५३.७८ पर्यंत झेप घेतली होती; तर निफ्टीने २६,२२२.४० निर्देशांकाचा आकडा गाठला होता. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात पहिल्यांदाच भारतीय शेअर बाजारात मोठी वाढ झाली आहे. यापूर्वी सप्टेंबर २०२४ मध्ये सेन्सेक्सने ८५,९७८ चा उच्चांक गाठला होता; तर निफ्टीने त्याच महिन्यात २६,२७७ पर्यंत उसळी घेतली होती.

# चरीच्या संपाचे स्मरण

## शेतकरी संपाचा वर्धापन दिन उत्साहात

## शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची उपस्थिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सावकारी विरोधात चरी परिसरातील असंख्य शेतकऱ्यांनी संप पुकारला होता. शेतकऱ्यांनी दाखविलेली एकजूट आणि मिळविलेला विजय अत्यंत प्रेरणादायी ठरला. त्यामुळे कसेल, त्याची जमीन हा कायदा मंजूर झाला. नारायण नागू पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी पुकारलेल्या या संपाचा ९२ वा वर्धापन दिन गुरुवारी (दि.२७) चरी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील स्तंभाला पुष्प अर्पण करून शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी अभिवादन केले.

पान २ वर





### शेतकऱ्यांचा संप मार्गदर्शक ठरणारा- चित्रलेखा पाटील

शेतकऱ्यांचे नेते स्व. नारायण नागू पाटील यांनी खोती विरोधात लढा पुकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा लढा आजच्या पिढीला एक मार्गदर्शक ठरणार आहे. स्व. नारायण नागू पाटील यांचे कार्य मोलाचे आहे. त्यामुळे आज असंख्य शेतकरी सन्मानाने जगत आहेत. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार स्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेदेखील या महान लढ्यासाठी मोलाचे योगदान राहिले आहे. चरी येथे साजरा होणाऱ्या संपाला ९२ वर्षे झाली आहेत. आजच्या पिढीपर्यंत महान नेत्यांचे कार्य पोहचविण्याची गरज आहे. या लढ्यामध्ये १४ गावांतील हजारो शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन हा संप यशस्वी करून दाखविला. त्यांचे कार्य कदापी न विसरण्यासारखे आहे. जगातील, देशातील सर्वात मोठा आणि प्रदिर्घ काळ चालणारा हा संप प्रत्येकाच्या स्मरणात राहणारा आहे, असे प्रतिपादन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

# अलिबागमध्ये आघोरीबाबांचा वावर

### अलिशान कारमधून शहरामध्ये फेरफटका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरामध्ये गेल्या दोन दिवसांपासून आघोरी बाबांचा वावर वाढला आहे. अलिबाग शहरातील वेगवेगळ्या भागात ही मंडळी अलिशान कारमधून फिरत आहे. ही मंडळी उत्तर प्रदेश राज्यातील असल्याची माहिती असून कोळीवाड्यातील एका उमेदवारांनादेखील भेटल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे.

अलिबाग शहरामध्ये यापूर्वी कधी आघोरी बाबांचा वावर दिसून आला नाही. मात्र अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या मतदानाची तारीख जशी जवळ येत आहे. त्या पध्दतीने गेल्या दोन दिवसांपासून अलिबाग शहरात उत्तर प्रदेश राज्यातील आघोरी बाबांचा वावर वाढला आहे. दोन मोठ्या अलिशान गाडीतून ही मंडळी शहरामध्ये ठिकठिकाणी फेरफटका मारीत आहेत. उत्तर प्रदेश राज्यातून ही मंडळी अलिबागमध्ये आल्याने वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला उत आला आहे. यातील काही आघोरी बाबा कोळीवाड्यातील एका उमेदवारालादेखील भेटण्यास गेल्याची चर्चा जोरात सुरू आहे. तो उमेदवार कोण असा प्रश्न जनतेमध्ये निर्माण झाला आहे. निवडणुकीत जिंकण्यासाठी असे अंधश्रद्धेला खतपाणी

पान २ वर

> शहराच्या प्रवेशद्वारासमोर तीन स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले आहे. ऐन निवडणुकीच्या कालावधीत हे उत्तरप्रदेश राज्यातून आघोरी बाबा शहरात दाखल झाले असल्यास त्यांची तपासणी करण्याची सूचना पथकाला देऊन माहिती घेण्यास सांगितले जाईल.
>
> – सागर साळुंखे, मुख्याधिकारी, अलिबाग

## नॅंककडे विना अनुदानितची पाठ

**मुंबई :** राज्य विद्यापीठ कायद्यानुसार प्रत्येक महाविद्यालयांना नॅंक मूल्यांकन आणि मानांकनाचा दर्जा घेणे बंधनकारक असताना राज्यातील दोन हजार ३६८ विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांपैकी केवळ ६८९ महविद्यालयांनी दर्जा घेतला आहे, तर उर्वरित तब्बल एक हजार ६७९ म्हणजेच ७५ टक्क्यांहून अधिक महाविद्यालयांनी नॅंकला पाठ दाखवली आहे. राज्यातील एक हजार २२५ अनुदानित महाविद्यालयांपैकी ३०४ म्हणजेच २५ टक्के महाविद्यालयांची नॅंकची पाच वर्षांची वैधता संपली आहे. दुसरीकडे अजूनही ४१ महाविद्यालयांनी म्हणजेच तीन टक्के महाविद्यालयांनी एकदाही नॅंकसाठी अर्ज केला

पान २ वर

# शेकाप, कॉंग्रेसचे उमेदवार आघाडीवर

### महाविकास आघाडीच्या उमेदवारांना उत्स्फुर्त प्रतिसाद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील शेकाप व कॉंग्रेसच्या उमेदवारांचा जल्लोषात सुरु आहे. प्रचारासाठी अवघे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आहे. गृह भेटीतून मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या उमेदवारांकडून केले जात आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांच्यासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारात शेकाप व कॉंग्रेसचे उमेदवार आघाडीवर असल्याचे दिसून आले.

महाविकास आघाडीतील शेकाप व कॉंग्रेसचे थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नमिता प्रशांत नाईक, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समिर मधुकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर.

पान २ वर



# वाळू माफियांवर सर्जिकल स्ट्राईक

### अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परवाने जागेवरच होणार रद्द

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गौण खनिजांची वाहतूक करताना सापडलेल्या वाहनांचा परवाना थेट निलंबित किंवा रद्द करण्याचे आदेश महसूल विभागाने दिले आहेत. राज्यातील वाळू व इतर गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाने राज्य परिवहन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कठोर निर्णय घेतला आहे. महसूल विभागाने यासंदर्भातील परिपत्रक बुधवारी (दि.२६) जारी केले.

राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू आणि इतर गौण खनिजांच्या चोरीमुळे शासनाच्या महसुलाची आणि पर्यावरणाची मोठी हानी तर होतेच, सोबतच या अवैध व्यवसायातून गुन्हेगारी वाढत असून,



> शासनाचा महसूल चूकविणे हा गंभीर गुन्हा असून, काही लोक जाणीवपूर्वक असा प्रयत्न करतात. त्यांना वचक बसावा यासाठी हा निर्णय घेतला आहे. यामुळे महसूल विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेने अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती तात्काळ परिवहन विभागाला कळवावी, जेणेकरून संबंधित वाहनांवर जागेवरच कारवाई करणे शक्य होईल. तसेच अवैध वाहतुकीला आळा बसेल.
>
> – चंद्रशेखर बावनकुळे

### या वाहनांवर करडी नजर

अवैध उत्खनन आणि वाहतुकीसाठी वापरले जाणारे ड्रील मशीन, जेसीबी व पोकलॅंड, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली, हाफ बॉडी ट्रक, फुल बॉडी ट्रक, डंपर, ट्रॉलर, कॉम्प्रेसर, ट्रॉलर, बार्ज, मोटोराईज्ड बोट, एक्सकॅव्हेटर, मॅकनाईज्ड लोडर यासारख्या सर्व प्रकारच्या वाहनांवर व साहित्यावरही कारवाई लागू असणार आहे.

कारवाईसाठी जाणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री यांनी दिलेल्या आदेशानुसार, अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी परिवहन विभागाच्या मदतीने आता कडक धोरण अवलंबण्यात आले आहे.

### अशी होणार कारवाई (तीन टप्प्यांत शिक्षा)

राज्य परिवहन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या नवीन निर्देशानुसार, अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पहिला गुन्हा : ३० दिवसांसाठी परवाना (परमिट) निलंबित करणे आणि वाहन अटकावून ठेवणे.

दुसरा गुन्हा : ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करणे आणि वाहन अटकावून ठेवणे.

तिसरा गुन्हा : संबंधित वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करणे आणि प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत पुढील कारवाईसाठी वाहन जप्त करणे.

## भरधाव ट्रेलरने बालकाला चिरडले

**पनवेल :** मुंब्रा-पनवेल महामार्गावरील रोडपाली सिग्नल येथे आठ रस्ते एकमेकांना मिळत असल्याने सिग्नल सुटण्यापूर्वीच अनेक वाहनांची वेधे स्पर्धा होते. याच स्पर्धेतून एका बालकाला त्यांचा प्राण गमवावा लागला. अपघाताची ही गंभीर घटना बुधवारी सकाळी पावणेबारा वाजता रोडपाली सिग्नलवर घडली. या भीषण अपघातामध्ये ट्रेलरच्या चाकाखाली नऊ वर्षांच्या बालकाचे डोके चिरडल्याने तो जागीच ठार झाला. वडीलांसोबत हा मुलगा स्कूटीवरून जात होता. तळोजा फेज २ येथील शुभ इन्क्लेव्ह या सोसायटीत राहणारे ४३ वर्षीय सुनील पाकळे हे त्यांचा मुलगा शार्विल याला घेऊन शाळेत सोडण्यासाठी

पान २ वर

# मुरुडमध्ये प्रचाराचा झंझावात

### मुरूडमधील महाविकास आघाडीच्या शेकाप, मनसे उमेदवारांचे स्वागत



**। आगरदांडा। प्रतिनिधी ।**

मुरुड नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील शेकाप व मनसेच्या उमेदवारांनी बुधवारी सायंकाळी कोळीवाडा, बाजारपेठ परिसरात प्रचार केला. या प्रचाराचा झंझावात पहावयास मिळाला. ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह तरुण मंडळी प्रचारात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मुरुडमधील महाविकास आघाडीच्या शेकाप, मनसेचे थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह नगरसेवकपदाच्या उमेदवारांचे मतदारांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. या प्रचारात स्वतः शेकाप प्रवक्त्या सामील झाल्याने एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला.

मुरुड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी थेट नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार ॲड.अंकिता माळी आहेत. नगरसेवक पदाचे प्रभाग दोनमधील

पान २ वर

## २ डिसेंबरनंतर होणार राजकीय उलथापालथ?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत, या निवडणुकीमध्ये जवळपास सर्वच पक्षांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्यानं अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना शिंदे गट आमने-सामने आल्याचं पहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्षातील संघर्ष देखील वाढला आहे, शिवसेना शिंदे गटातून भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरू असल्यानं शिवसेना शिंदे गट नाराज आहे, तर दुसरीकडे बुधवारी शिवसेना शिंदे गटाचे नेते निलेश राणे यांनी थेट भाजप कार्यकर्त्याच्या घरात घुसून, स्थानिक स्वराज्य

पान २ वर

# उरणमधील भाजप उमेदवार अडचणीत?

### अर्जात चुकीची माहिती दिली असल्याचा आरोप

**। उरण । प्रतिनिधी ।**

नगर परिषदेच्या निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र दाखल करताना भाजपच्या महिला उमेदवार कादरी शाहिस्ता मुहम्मद इब्राहिम यांनी उमेदवारी अर्जात चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचीच दिशाभूल करणाऱ्या माहितीची पडताळणी करून त्यांचा उमेदवारी अर्ज रद्द करावा, त्यांच्या विरोधात तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी मविआच्या उमेदवार प्रार्थना चेतन म्हात्रे यांनी केली आहे.

उरण नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी जाहीर झाली आहे. या निवडणुकीत प्रभाग क्र.७–अ च्या सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेसाठी कादरी शाहिस्ता मुहम्मद इब्राहिम यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र त्यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जात मुहम्मद इब्राहिम कादरी फ्लॅट नं.००१/बी. पिनकोड क्र.४००७०२ असा पत्ता दिलेला आहे.

हाच पत्ता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्वांच्या माहितीसाठी लावलेल्या उमेदवार नोटीस बोर्डवरील प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून जाहीर केला आहे. मात्र कादरी मंझील नावाची ही जुनी इमारत अत्यंत धोकादायक झाली आहे. त्यामुळे उरण नगर परिषदेने राहण्यास धोकादायक असलेली इमारत याआधीच धोकादायक ठरवली आहे. त्यामुळे येथे कुणीही राहात नाही. मात्र त्यानंतरही महिला उमेदवार कादरी शाहिस्ता मुहम्मद इब्राहिम यांनी उमेदवारी अर्जात चुकीचा पत्ता दिलेला आहे. या प्रकरणी शाहिस्ता मुहम्मद इब्राहिम यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात यावा. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची दिशाभूल केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात तातडीने कारवाई करून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी विनंतीही प्रार्थना म्हात्रे यांनी उरण निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीतून केली आहे.

प्रभाग क्रमांक –७ मध्ये सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित असलेल्या

पान २ वर

## हवामान विभागाचा पावसाचा इशारा

**मुंबई :** देशासह राज्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे, अनेक राज्यांना पावसानं झोडपून काढलं आहे. पावसामुळे अनेक राज्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. महाराष्ट्राला देखील यावर्षी पावसाचा चांगलाच तडाखा बसला, महाराष्ट्रात पावसामुळे मोठं नुकसान झालं. दरम्यान आता पुन्हा पावसाची शक्यता आहे. चक्रीवादळ सेन्यारनंतर पुन्हा एकदा एक नवं चक्रीवादळ बंगालच्या उपसागरात तयार झालं आहे. या चक्रीवादळाला डिटवाह असं नाव देण्यात आलं आहे, यमन देशानं या चक्रीवादळाला हे नाव दिलं आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा देशातील काही भागांमध्ये जोरदार

पान २ वर

## युनेस्कोच्या मुख्यालयात महामानवाच्या पुतळ्याचे अनावरण



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

संविधान दिनाचे औचित्य साधत संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे युनेस्कोच्या पॅरिसमधील मुख्यालय प्रांगणात अनावरण करण्यात आले.

राज्य सरकारने युनेस्कोच्या मुख्यालयाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट म्हणून दिला होता. युनेस्कोच्या मुख्यालयात युनेस्कोचे महासंचालक खालिद अल-इनाय यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. यावेळी भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. राज्य सरकारने यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील घर खरेदी आणि त्याचे संग्रहालयात रूपांतरण केले आहे. जपानमधील कोयासान विद्यापीठातही डॉ. बाबासाहेबांचा पुतळा उभा राहिला आहे. आता मुंबईतील इंदूमिल येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामालाही वेग दिला आहे.

### नैसर्गिक ताळमेळ बिघडल्याने आहाराची कमतरता | पक्षीप्रेमींना गुलाबी पाहुण्यांची आस

# ‘फ्लेमिंगो सिटी’तील पाणथळ जागा ओस

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईच्या खाडीकिनाऱ्याला नवा रंग देणारे फ्लेमिंगो पक्षी यंदा मात्र अद्यापही शहरात आले नाहीत. लांबलेल्या पावसामुळे पाणथळ जागांचा नैसर्गिक ताळमेळ बिघडल्याने आणि आहाराची कमतरता निर्माण झाल्याने त्यांच्या स्थलांतराला विलंब होत असल्याचे पर्यावरणतज्ज्ञ सांगत आहेत.



फ्लेमिंगोंचे मूळ वास्तव्य आफ्रिका, युरोप आणि दक्षिण अमेरिकेतील खारफुटी प्रदेशात आढळते. भारतात मात्र या पक्ष्यांच्या दोन प्रमुख प्रजाती म्हणजेच ग्रेटर फ्लेमिंगो आणि लेसर फ्लेमिंगो या मोठ्या प्रमाणावर आढळतात. नवी मुंबईत दरवर्षी येणारे हे पक्षी मुख्यत्वे गुजरातमधील कच्छ आणि राजस्थानातील मिठागर प्रदेशातून स्थलांतर करून खाडी परिसरातील पाणथळ जागांकडे वळत असतात. नोव्हेंबर ते मे हा त्यांचा नवी मुंबईतील नियमित वावराचा काळ मानला जातो. जानेवारी ते मार्चदरम्यान त्यांची शहरातील पाणथळ भागातील उपस्थिती शिगेला पोहोचते.

नेरुळ–सीवूड्स परिसरातील टीएस चाणक्य येथील पाणथळ जागा, डीपीएस तलाव, ज्वेल ऑफ नवी मुंबई तसेच खाडीजवळील खारफुटी पट्टा ही त्यांची प्रमुख ठिकाणे मानली जातात. या अधिवासांत सूक्ष्म शैवाल आणि खाऱ्या पाण्यातील लहान जीवसृष्टी मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने फ्लेमिंगोंना हा परिसर नैसर्गिकरीत्या अनुकूल वाटतो.

यंदा लांबलेल्या

पान २ वर

### २०१७ च्या पुनरावृत्तीची भीती

लांबलेला पावसाळा आणि गायब झालेल्या थंडीमुळे फ्लेमिंगो अद्याप गुजरातच्या कच्छ भागात असल्याचा अंदाज आहे. बदलत्या पर्यावरणाचा परिणाम म्हणून २०१७ साली केवळ एकच महिना फ्लेमिंगो नवी मुंबईत पाहायला मिळाले होते. तशीच काहीशी परिस्थिती सध्या दिसत आहे. तरी यावर्षीच्या अखेरीस फ्लेमिंगो नवी मुंबईत येण्याची शक्यता आहे, असे सेव्ह नवी मुंबई एन्व्हायरमेंट संस्थेचे अध्यक्ष सुनील अग्रवाल यांनी सांगितले.

# मुंबई वाहतूक कोंडीला नवा उतारा

## १० जलवाहतूक मार्गांचा महाआराखडा!

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) वाहतूक कोंडीवर उतारा म्हणून जलवाहतूकीचा पर्याय येत्या काळात उपलब्ध होणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र सागरी मंडळाकडून मुंबई महानगर प्रदेशात २०० किमीहून अधिकचे नवीन जलवाहतुकीच्या मार्गाचे जाळे विणले जात आहे.

त्यात १० मार्गांचा समावेश असून डिसेंबरअखेरपर्यंत आराखडा पूर्ण होणार आहे. त्या दहा मार्गांमध्ये नवी मुंबई विमानतळ ते गेटवे ऑफ इंडिया या मार्गाचाही समावेश असून तेथून वॉटर टॅक्सी धावणार आहे. १८ किमीच्या या मार्गामुळे वॉटर टॅक्सीने नवी मुंबई विमानतळ ते गेटवे ऑफ इंडिया अंतर ४५ मिनिटात पार करता येणार आहे.

सध्या २१ जलवाहतूक मार्ग सेवेत असून त्यातील १२ जलवाहतूक मार्ग एमएमआरमधील आहेत. जलवाहतूक मार्गांचा अधिक विस्तार करण्याचा निर्णय सागरी मंडळाने घेतला आहे. त्यानुसार नवीन १० जलवाहतूक मार्ग सेवेत दाखल करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. नवीन मार्गांवर प्रवासी बोटी, रो-रो सेवा आणि वॉटर टॅक्सी धावणार आहेत. डिसेंबरअखेरपर्यंत आराखडा तयार होईल अशी माहिती सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी यांनी दिली.

मुंबईतून नवी मुंबई, ठाणे, वसई, विरार, भाईंदर आणि अन्य ठिकाणी जलवाहतूक मार्गाने पोहचता यावे यासाठी नवीन १० जलवाहतूक मार्गांची आखणी केली जात आहे. त्यात वसई ते काल्हेर, कल्याण-मुंब्रा-काल्हेर-कोलशेत, काल्हेर ते नवी मुंबई विमानतळ, वाशी ते नवी मुंबई विमानतळ, गेटवे ते नवी मुंबई विमानतळ, वसई ते मार्वे अशा काही मार्गांचा समावेश आहे. एकूण २०० किमीहून अधिकच्या जलवाहतूक मार्गांचा आराखडा तयार करण्यात येत आहे. या कामासाठी अंदाजे २५०० कोटींहून अधिक खर्च अपेक्षित आहे.



### दक्षिण मुंबई ते नवी मुंबई विमानतळ पाऊण तासांत

सागरी मंडळाच्या १० मार्गांमध्ये नवी मुंबई विमानतळ ते गेटवे ऑफ इंडिया मार्गाचा समावेश असून या मार्गावरुन वॉटर टॅक्सी धावणार आहे. हा जलवाहतूक मार्ग १८ किमीचा आहे. तो विकसित करण्यासाठी अंदाजे ३०० कोटींचा खर्च अपेक्षित असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या जलवाहतूक मार्गांवरुन किती आसनांची वॉटर टॅक्सी धावेल, ती कशी असेल, त्यासाठी किती तिकिट दर असतील यासंबंधीची सर्व माहिती आराखडा तयार झाल्यानंतर निश्चित होईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता एक इसम कोठेतरी निघुन गेले ते अदयापपावेतो घरी परत आली नाही. म्हणून ते हरविल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे . कैलास राजभर रा. देवीचा पाडा , हे असून त्यांचा रंग-सावळा, बाधा-सडपातळ, चेहरा-उभट, नाक-टोकदार, केस काळे लहान, अंगात नेसुससे रंगाचा फुल बाड्यांचा शर्ट व ग्रे रंगाची फुल पेंट, काळ्या रंगाचा शुज घातलेला आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार राजेंद्र साळुंखे यांच्याशी संपर्क साधावा.



# बेकायदेशीर बांधकामांचा सुळसुळाट

## ■ मुख्यमंत्री सचिवालयाकडून चौकशीचे आदेश

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुका आणि उरण नगरपरिषद हद्दीत बेकायदेशीर बांधकामांचा सुळसुळाट वाढला आहे. उरणकरांकडून याविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे. अखेर हा संपूर्ण घोटाळा थेट मुख्यमंत्री सचिवालयापर्यंत पोहोचला आहे.

करंजा गावातील सचिन रमेश डाऊर यांनी दाखल केलेल्या लेखी तक्रारीवर कोकण विभागातील मुख्यमंत्री सचिवालयाने तात्काळ दखल घेत रायगड जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी व कठोर कारवाईचे स्पष्ट आदेश दिले आहेत. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी सचिवालयातून जारी करण्यात आलेल्या पत्रात तक्रारीतील सर्व मुद्द्यांची तातडीने तपासणी करून नियमांनुसार कारवाई करत सविस्तर अहवाल सादर करण्याची सक्त सूचना करण्यात आली आहे. या आदेशानंतर उरण नगरपालिका प्रशासन व त्यांना राजकीय संरक्षण देणाऱ्या मंडळींमध्ये मोठी हलचल निर्माण झाली आहे.

उरण नगरपरिषद हद्दीत अनेक वर्षांपासून बांधकाम नियमांची उघडपणे पायमल्ली सुरू असून, नगरपरिषदेने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे. बिल्डर लॉबीने राजकीय आच्छादनाखाली मंजुरीपूर्वीच इमारती उभारणे, नियमांपेक्षा जादा मजले बांधणे, सार्वजनिक जागांवर अतिक्रमण करणे, तसेच परवानगीशिवाय बांधकामांचा वेग वाढवणे, अशा उघडपणे बेकायदेशीर कृत्यांना वर्षानुवर्षे संरक्षण मिळत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. या सगळ्यात कारवाई नावाची काहीच न झाल्याने नागरी प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय निर्माण झाला आहे. या बेकायदेशीर बांधकामांमुळे नागरिक त्रस्त झालेले असताना, बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकण्याचे प्रमाण धोकादायकरीत्या वाढले आहे.

बांधकाम स्थळांवरून थेट मुख्य रस्त्यांवर व गल्ल्यांमध्ये विटा, वाळू, सिमेंट, लोखंडी सळ्या आणि मुरूमाचे ढिगारे टाकले जात आहेत. या ढिगाऱ्यांमुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण होऊन स्कुटर, चारचाकी वाहनांचा प्रवास खोळंबतो आहे; तर रुग्णवाहिकांसारखी अत्यावश्यक वाहनेही अडकण्याच्या घटना वाढल्या आहेत. रात्रीच्या वेळी अंधारात हे ढिगारे नजरेस न पडल्याने अपघाताचा धोका अधिक वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षेवर गंभीर परिणाम झाला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नगरपालिका प्रशासन बिल्डरांच्या दबावाखाली असल्याने या गंभीर गुन्ह्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे.

पत्रकार, सामाजिक संघटना आणि जागरूक नागरिकांनी वारंवार लिखित तक्रारी दाखल करूनही कुठलीही ठोस कृती न झाल्याने उरणकरांकडून नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक राजकीय व्यक्तींनी दिलेल्या संरक्षणामुळेच बेकायदेशीर बांधकामांना उधाण आले, असा स्पष्ट आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. उरणच्या विकासाचा गाजावाजा करणाऱ्या राजकीय घराण्यांच्या पाठीमागे नक्की कोणत्या बिल्डरांचा 'माल' जातो, हा प्रश्न आता सरळ जनतेतून राजकीय स्तरावर भिडू लागला आहे.

स्थानिक प्रशासनाने सातत्याने निष्क्रियता दाखविली, तर राजकीय हस्तक्षेपाच्या दबावाखाली कारवाईच होत नसल्याने लवकरच या प्रकरणात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल होण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

### न्यायालयीन लढाईची शक्यता

मुख्यमंत्री सचिवालयाच्या आदेशानंतर उरणमधील संपूर्ण बेकायदेशीर बांधकाम घोटाळा राज्यभर चर्चेत आला असून, नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका पोहोचवणाऱ्या या समस्येची लपवाछपवी आता शक्य राहिलेली नाही. येत्या काही दिवसांत या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढणार असून, उरणमधील बेकायदेशीर बांधकामांचा मुद्दा थेट न्यायालयीन पातळीवर जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

## १ लाख १२ हजारांची ऑनलाईन फसवणूक

। पनवेल । वार्ताहर ।

जुने वापरते फ्रिज विकत घेण्याचा बनाव करून खोटी माहिती देऊन वेगवेगळे स्कॅनर पाठवले आणि १ लाख १२ हजारांची ऑनलाइन फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रितिका अलुवालिया या कामोठे, येथे राहत असून, त्यांनी घरातील जुने फ्रिज विक्रीसाठी ओएलएक्स या सोशल मीडियावर टाकले. त्या वेळी त्यांना समोरील इसमाने यांचे नाव संजय कुमार असून खारघर येथे फर्निचरचे दुकान असल्याचे सांगितले आणि क्यूआर कोड पाठवतो, गुगल पेमधून स्कॅन करा आणि तुम्हाला पाच रुपये येतील, असे सांगितले. ती प्रोसेस केल्यानंतर ५ रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले. पुन्हा समोरील इसमाने १०० रुपये पाठवले. या वेळी पुन्हा एक स्कॅनर पाठवला. तो स्कॅन केला असता रितिका यांच्या आईच्या खात्यातून १४ हजार ५०० वजा झाले. त्यानंतर पुन्हा स्कॅन करा असे सांगितले असता, त्यांच्या आणि आईच्या खात्यातून एकूण १ लाख १२ हजार ३०० रुपये वजा झाले.

पान १ वरून

## अलिबागमध्ये आघोरी बाबांचा वावर

घालण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात अलिबाग पोलीस कारवाई करतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. निवडणुकीच्या कालावधीत काही गैरप्रकार घडू नये, म्हणून अलिबाग शहराच्या सीमारेषेवर तीन स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले आहे. या पथकाद्वारे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्याचे काम केले जात आहे. मात्र उत्तरप्रदेश राज्यातून ऐन निवडणुकीच्या कालावधीत येणाऱ्या या आघोरी बाबांच्या गाडीकडे दुर्लक्ष का असा सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे.

## चरीच्या संपाचे स्मरण

यावेळी चरी येथील माजी सरपंच निलम पाटील, शेकाप तालुका सहचिटणीस नरेंद्र म्हात्रे, नारायण जाधव, कृषी अधिकारी तथा चरी ग्रामपंचायत प्रशासक राजेश घरत, उरणचे सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील, पराग पाटील, महाड येथील मिलींद टीपणीस आदी मान्यवरांसह शेतकरी, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आग्निवीर प्रज्योत पाटील, स्वच्छता दूत पंकज पाटील, स्व. नाना पाटील यांची रांगोळी जिने काढली ती कोपरगावची तन्वी ठाकूर, माजी सैनिक संतोष ठाकूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कोकणात चार शतकांपासून जमीन महसूलाची खोती पध्दत चालू होती. खोत, सावकारांच्या मगरमिठीत सापडलेला शेतकरी स्व. नारायण नागू पाटील व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार स्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जागा झाला. सावकारांविरोधात प्रदिर्घ वर्ष चरी या ठिकाणी शेतकऱ्यांचा संप चालला.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग परिसरात तब्बत सात वर्षे शेतकरी संपावर गेले होते. त्या काळातील खोतीपध्दती विरोधात शेतकऱ्यांनी लढा दिला होता. चरी या ठिकाणी शेतकऱ्यांनी परिषद भरवून लढ्याचे रणशिंग फुंकले होते. एक अभूतपूर्व आंदोलन करण्यात आले होते. परिसरातील १४ गावे या संपात सहभागी झाली होती. १९३३ ते १९३९ या सात वर्षाच्या कालखंडात हजारो शेतकऱ्यांनी अन्नाचा कण न पिकविता संप पुकारला होता. या संपामुळे कसेल त्याची जमीन हे नैसर्गिक न्याय तत्व अंमलात आणणारा कुळ कायदा मंजूर झाला. नारायण नागू पाटील यांच्या प्रभावशाली नेतृत्वाला अभिवादन देण्याबरोबरच संपातील शेतकऱ्यांच्या संघर्षमय स्मृतींना उजाळा देण्यासाठी चरी या ठिकाणी ९२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सुरुवातीला स्मारकाला मानवंदना देण्यात आली. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते स्तंभाला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वर्धापन दिनाच्या निमित्ताने चरी पंचक्रोशीतील १४ शाळेतील विद्यार्थ्यांसाठी २५ नोव्हेंबरला वकृत्व, रांगोळी, निबंध, चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतील विजेत्या ४० हून अधिक विद्यार्थ्यांचा २७ नोव्हेंबर रोजी चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना नारायण नागू पाटील यांच्या कार्याची माहिती देत शेतकऱ्यांच्या संघर्षाच्या स्मृतींना उजाळा दिला. यावेळी ग्रामपंचायतीकडून शेतकऱ्यांना शेती अवजारांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुरेंद्र पाटील, पराग पाटील, अनंत थळे, विनायक पाटील, नारायण जाधव, मनोज थळे यांनी मेहनत घेतली.

## शेकाप, काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर

प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदिप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

छाननी झाल्यानंतर प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. शहरातील प्रत्येक प्रभागातील महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवारांनी प्रत्यक्ष मतदारांना भेटून खटारा आणि हाताचा पंजा चिन्हा समोर बटन दाबून मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी प्रचाराचा झंझावात पहावयास मिळाला. अलिबाग शहराला राजकीय, सामाजिक वारसा असलेल्या अक्षया नमिता प्रशांत नाईक यांच्या माध्यमातून तरुणाईला नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. त्यामुळे प्रचाराच्या दरम्यान अक्षया नाईक यांच्यासह महाविकास आघाडीच्या उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रचाराचा कालावधी संपण्यासाठी अवघे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. प्रचाराचा अंतिम टप्पा सुरु असून शहरामध्ये प्रचार वेगाने सुरू आहे.

नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया प्रशांत नाईक, प्रभाग सहामधील नगरसेवक पदाचे उमेदवार ॲड.अश्वीनी ठोसर व ॲड. ऋषीकेश माळी, यांचा गुरुवारी सायंकाळी ब्राह्मणआळी परिसरात प्रचार करण्यात आला. श्री सिध्दीविनायकाचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात करण्यात आली. सिध्दीविनायक, ओमसागर, सुतारवाडा, मोघे खानावळ अशा अनेक भागात गृहभेटी घेऊन प्रचार करण्यात आला. खटारा चिन्हासमोरील बटन दाबून मतदान करा असे आवाहन ही यावेळी करण्यात आले. यावेळी अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका वृषाली ठोसर, ऋषीकेश ठोसर, प्रमोद झुंजारराव, देवेंद्र मानकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. वेगवेगळ्या प्रभागात प्रचार जोमाने सुरु असल्याचे दिसून आले.

## मुरूडमध्ये प्रचाराचा झंझावात

उमेदवार संकेत अपराध, प्रभाग तीनमधून सिध्देश सुरते, प्रभाग चारमधून अनंत म्हसळकर, रुमण्णा मजगांवकर, प्रभाग पाचमधून मनिष माळी, प्रभाग सहामधून मनिष शमा, युविका भगत, रुमण्णा मजगांवकर, अंकित गुरव, प्रभाग आठमधून प्रयास वरसोलकर, प्रभाग नऊमधून रसिका मयेकर, प्रभाग दहामधून जागम पुलेकर हे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

मुरूडमध्ये प्रचाराचा झंझावात पहावयास मिळत आहे. शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य तथा शेकाप तालुका माजी चिटणीस अनिल पाटील, फैसल उलडे, मनोहर बैले, पुरोगामी युवक संघटना तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, शैलेश खोत, मधुकर ढेबे, निशीकांत कोळसे, अमोल मिठाग्री, मनीष माळी, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अंकिता माळी, प्रयास वरसोलकर, जागन पुलेकर, किर्ती शहा, वसीम अन्वरे, शेकाप मनसेचे कार्यकर्ते आदींनी मुरूडमधील वेगवेगळ्या भागात जाऊन मतदारांची भेट घेतली.

शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी स्वतः प्रचारात सहभागी होत मतदारांसमोर जाऊन मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी मतदारांकडून उमेदवारांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मुरूडमध्ये प्रचार वेगात सुरु असून मतदारांकडून प्रचाराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मुरूडमधील कोळीवाडा, बाजारपेठ परिसरात प्रचार बुधवारी करण्यात आला. गृहभेटीतून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळा उत्साह निर्माण झाला.

## 'फ्लेमिंगो सिटी'तील पाणथळ जागा ओस

पावसामुळे शहरातील अनेक पाणथळ जागा अद्याप स्थिर झालेल्या नाहीत. पाण्याची पातळी जास्त असून, काही ठिकाणचे जलप्रवाह अडथळ्यांमुळे असंतुलित आहेत. त्यामुळे सूक्ष्म शैवालांची वाढ कमी झाल्याने फ्लेमिंगोंच्या आहारात घट निर्माण झाली आहे. फ्लेमिंगो हे अतिशय संवेदनशील पक्षी आहेत. पाणथळ पट्ट्यांचा दर्जा आणि आहारातील छोटा बदलही त्यांच्या स्थलांतरावर थेट परिणाम करतो, असे स्थानिक पर्यावरण अभ्यासकांनी म्हटले आहे. तज्ज्ञांच्या मते, ही केवळ पक्ष्यांच्या उशिरा आगमनाची बाब नाही; तर नवी मुंबईतील पाणथळ परिसंस्थेला गंभीर धोक्याचा इशारा आहे.

शहराची फ्लेमिंगो सिटी ही ओळख टिकवायची असेल, तर पाणथळ जागांचे संरक्षण, जलप्रवाहाचा ताळमेळ आणि खाडी परिसरातील परिसंस्थेचे आरोग्य तातडीने मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचे मत पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

## २ डिसेंबरनंतर होणार राजकीय उलथापालथ?

संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजप मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोप केला आहे, भाजपने हे आरोप फेटाळून लावले आहेत, मात्र यामुळे आता दोन्ही पक्षातील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे.

यावर प्रतिक्रिया देताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. दोन तारखेपर्यंत मला युती टिकवायची आहे, त्यामुळे मी आता काही बोलणार नाही. मी नंतर उत्तर देईल. निलेश राणे जे आरोप करत आहेत ते खोटे आहेत, असं चव्हाण यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून आता शिवसेना शिंदे गटाला थेट युतीची ऑफर देण्यात आली आहे, याबाबत बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

**नेमकं काय म्हणाले शशिकांत शिंदे?**

शरद पवारांनी सांगितले होते, भाजप सोडून कुणाशीही आघाडी करा, त्यानुसार कुर्डूवाडीत आमची युती शिवसेना शिंदे गटासोबत झाली आहे. ज्यावेळेस फार अति होतं तेव्हा बंड होतं. हा नियतीचा नियम आहे. त्यांनी मनात आणलं तर ही नवी नांदी होऊ शकते. दुसऱ्या सातारकरांनी ठरवायचं आता काय करायचं ते, आम्ही तर कुर्डुवाडीत निर्णय घेतला आहे, असं म्हणत शशिकांत शिंदे यांनी थेट शिंदे गटाला ऑफर दिली आहे, त्यामुळे आता शिवसेना शिंदे गट काही मोठा निर्णय घेणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाची नाराजी वाढतच चालल्याचं दिसून येत आहे.

## भरधाव ट्रेलरने बालकाला चिरडले

स्कूटीवरून रोडपाली बाजूकडे जात असताना ही घटना घडली. कासाडी नदीचा पुल ओलांडल्यानंतर ते रोडपाली सिग्नल अगोदर ३० फूट अंतरावर हा अपघात घडला. रोडपाली सिग्नल गाठण्याच्या धांदलीत भरधाव वेगाने चाललेल्या ट्रेलर चालकाने डाव्या बाजूकडे न पाहता स्कूटीला ठोकर दिली. या ठोकरीत स्कूटीवरून चाललेले बापलेक रस्त्यावर कोसळले. अपघातामध्ये स्कूटीला ठोकर लागल्याचे समजूनही ट्रेलर चालकाने त्याच्याजवळील ट्रेलर थांबवला नाही. त्याने अजून ट्रेलर दामटवला. या दरम्यान ट्रेलरचे मागील चाक बालक शर्विल याच्या डोक्यावरून गेले.

गंभीर जखमी झालेला शर्विलचे या अपघातामध्ये प्राण गेले. शर्विल हा दूसरीत शिकणारा बालक होता. त्याचे वडील स्वतः स्कूलव्हॅन चालक आहेत. रोडपाली येथील सुनिल यांनी त्यांची व्हॅन उभी केल्यामुळे त्या व्हॅनपर्यंत शर्विलला घेऊन ते स्कूटीने जात होते. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात २२ वर्षीय ट्रेलरचालक राजकरण वर्मा याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून त्याला ताब्यात घेतले आहे. सहायक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके अधिक तपास करीत आहेत. रोडपाली सिग्नल जवळील अरुंद मार्गिकेमुळे हे ठिकाण वाहतूक कोंडीचे मुख्य ठिकाण बनले आहे. मुंब्रा-पनवेल महामार्गावर धानसर (रोहिंजण) गावाजवळ पथकर नाका (टोलनाका) असून या मार्गावरून वाहतूक करणाऱ्या चारचाकी मोटारी व जड, अवजड वाहनांकडून टोल वसूली केली जाते. मात्र रस्ते रुंदीकरणाच्या कामाकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) दुर्लक्ष केले आहे. कळंबोली वाहतूक पोलीस विभागाने वारंवार एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना नावडे फाटा ते रोडपाली सिग्नल या महामार्गावर अरुंद रस्ता रुंद करण्याची विनंती लेखी पत्राने करूनही त्या पत्राला केराची टोपली दाखविली जात आहे.

## उरणमधील भाजप उमेदवार अडचणीत?

जागेसाठी दोनच उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे तक्रारीनंतर निवडणुकीत शाहिस्ता मुहम्मद इब्राहिम यांचा उमेदवारी अर्ज रद्द झाल्यास उरण भाजपसाठी तो मोठा धक्का ठरणार आहे. त्यामुळे तक्रारीनंतर भीतीने भाजप गोटात चांगलीच खळबळ माजली आहे. याबाबत उरण निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम यांनी पत्ता चुकीचा दिला म्हणून अर्ज रद्द करता येत नाही. अशी माहिती त्यांनी दिली.

## नॅककडे विना अनुदानितची पाठ

नसल्याची माहितीही उच्च शिक्षण विभागाच्या अहवालातून उघड झाली आहे. शासकीय महाविद्यालयांत २८ महाविद्यालयेही नॅकचा दर्जा घेण्यात आघाडीवर आहेत. २०३ महविद्यालयांनी अ दर्जा, ६७ महाविद्यालयांनी अ प्लस आणि २० महविद्यालयांनी अ ट्रिपल प्लसचा दर्जा मिळवला आहे.

राज्यातील प्रत्येक महाविद्यालयाने नॅकचा दर्जा घ्यावा, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परिसस्पर्श योजना मागील दोन वर्षांपासून सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारचे मार्गदर्शन, सहकार्य करण्यासाठी यंत्रणा राबवली जाते. त्याकडेही बहुसंख्य महाविद्यालयांनी दुर्लक्ष केले आहे.

राज्यात ११ अकृषी विद्यापीठांतर्गत शासकीय अनुदानित, विनाअनुदानित अशी तीन हजार ८५८ वरिष्ठ महाविद्यालये असून, यात ३० लाखांच्या दरम्यान विद्यार्थी शिक्षण घेतात. यात दोन हजार ७४१ महाविद्यालये, संस्थांनी नॅक मानांकन आणि मूल्यांकन पूर्ण करून घेतले असून, देशातील इतर राज्यांच्या तुलनेत नॅकसाठी राज्याचे स्थान देशात प्रथम आहे.

विनाअनुदानित महाविद्यालयांना नॅकचा दर्जा घेण्यासाठी स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. विद्यापीठांनी यासाठी पुढाकार घेऊन संबंधित महाविद्यालयांना तो दर्जा घेण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले पाहिजेत अन्यथा त्यांच्यावर विद्यापीठ कायद्यानुसार मान्यता काढून घेण्याची तरतूद आहे, असे उच्च शिक्षण संचालनालय, संचालक,डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी सांगितले.

## हवामान विभागाचा पावसाचा इशारा

पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार हे बंगालच्या उपसागरात निर्माण झालेलं चक्रीवादळ तीस नोव्हेंबरपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे.हवामान विभागनं दिलेल्या माहितीनुसार चक्रीवादळ सेन्यारचे रुपांतर हे निकोबर बेटाच्या उत्तरेला ८५० किलोमीटर अतंरावर आता कमी दाबाच्या पट्ट्यात होण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे आता आणखी एक चक्रीवादळाची निर्मिती झाली आहे, चक्रीवादळ डिटवाह हे आता उत्तर -पश्चिमेकडे सरकत असून ते ३० नोव्हेंबरपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा परिणाम म्हणून दक्षिणेकडील काही राज्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. चक्रीवादळ डिटवाहच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूमधील काही जिल्ह्यांमध्ये चेन्नई तसेच आध्र प्रदेशच्या किनारी भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागाकडून या प्रदेशांना पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.दक्षिण भारतामधील काही राज्यांमध्ये पुन्हा पावसाची शक्यता आहे.

दरम्यान दुसरीकडे उत्तर भारतात मात्र थंडीचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता आहे, मध्य भारतात देखील थंडी वाढण्याची शक्यता आहे, महाराष्ट्रात हवामान विभागाकडून कोणताही पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही, मात्र सरासरी तापमानाता घट होऊन पठारी प्रदेशात थंडीची लाट पहायला मिळू शकते असा अंदाज आहे.

# पनवेल शहर पोलिसांना केले सन्मानित



। पनवेल । प्रतिनिधी।

पनवेल शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी वर्गासह कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालय नवी मुंबई यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे .

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंढे, पोहवा माधव शेवाळे, पोशी साधना पवार, पोना सम्राट डाकी, रवींद्र पारधी आदीनी आतापर्यंत केलेल्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल त्यांना प्रोत्साहनपर प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

आर टी एस अपील क्र १०३/२०२५

**श्रीवर्धन येथील मे. उपविभागीय अधिकारी सारे यांचे न्यायालयात**

१) शशिकांत कृष्णा सावंत
वय-६० वर्षे, धंदा व्यवसाय
राहणार कुणबीवाडी ता श्रीवर्धन, जि रायगड — अपीलकार

वि.

१२) अनुराधा महेंद्र शेलार
वय सज्ञान धंदा शेती
१३) राजश्री राहुल सोनावणे
वय सज्ञान धंदा शेती — सामनेवाला
१४) नरेंद कुमार
वय सज्ञान धंदा शेती

वर नमुद सर्व राहणार कुणबीवाडी ता. श्रीवर्धन जि. रायगड

मौजे कुणबीवाडा येथील फेर फार नोंद क्र ५३७ बाबत दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशाबाबत या न्यायालयात अपील दाखल आहे. सदर अपीलामधील वर नमुद सामनेवाला १२, १३, १४ यांना वेळोवेळी सदर दाव्याचे समन्स व नोटीसची बजावणी करणेकरीता मा. न्यायालयामार्फत त्यांचे अंतिम ज्ञात पत्त्यावर समन्स व नोटीसची बजावणी करणेकरीता हरएक प्रकारे प्रयत्न करुनही समन्सची बजावणी झालेली नाही. त्यामुळे मा. न्यायालयाने दिनांक १३/११/२०२५ रोजी केलेल्या आदेशानुसार पेपरमध्ये जाहिर समन्स व नोटीस देण्याचा आदेश केलेला आहे. त्याअर्थी वरील सामनेवाला १२,१३,१४ यांना कळिवण्यात येते की त्यांनी दि. ११-१२-२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता श्रीवर्धन उपविभागीय कार्यालयात स्वतः अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर होऊन आपले म्हणणे मांडावे.

उक्त तारखेस व वेळेस आपण हजर न झाल्यास आपणास सदरबाबत काहीही सांगावयाचे नाही असे गृहित धरले जाईल व पुढील आदेश केले जातील. तरी सदरची नोटीस मे. न्यायालयाच्या आदेशानुसार व सहीनिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली असे.

दिनांक- २७/११/२०२५ — सही/-
शिक्का — **उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन**

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक १ श्री. माधव अनंत गोखले, २ श्री. श्रीकांत भास्कर गोखले, ३. श्री. अविनाश सखाराम गोखले, ४. श्रीमती. वैजयंती मुकुंद गोखले, ५. श्री. शशांक रघुनाथ गोखले, ६. श्री. अनिल प्रभाकर गोखले, ७. श्रीमती. पुर्वा पुरूषोत्तम देवधर, ८. श्री. शिरीष रघुनाथ गोखले, ९. श्रीमती अनुराधा धनंजय केळकर, १०. श्री. चंद्रशेखर भास्कर गोखले, ११. श्री. नंदकुमार भास्कर गोखले, १२. श्रीमती. अंजली अशोक गोखले, १३. श्रीमती. चैत्राली अशोक गोखले, १४. श्री. समीर मुकुंद गोखले, १५. श्रीमती वृषाली किशोर देशमुख, १६. श्री. मिलींद रामचंद्र गोखले, आणि १७. श्री. किशोर रामचंद्र गोखले यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे ता. अलिबाग | ८३५/२/३ | १-१६-४० | २.३५ |

वर नमुद मिळकती पैकी विद्यमान मालक क्र. १ ते १७ यांचे मालकिचे क्षेत्र ०-९७-४० हे. आर. आकार १.९७ रू. पै. पैकी रस्तालगत असलेले पुर्वेकडील क्षेत्र ०-५३-५ हे. आर. इतके क्षेत्र या नोटीसचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक- /११/२०२५ — सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय-रायगड, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

# मुरूडच्या विकासासाठी कटीबद्ध



## चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

विकासाचे व्हिजन घेऊन आम्ही मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्या निवडणुकीला सामोरे जात आहोत. त्यामुळे येथील जनतेने शेतकरी कामगार पक्षाला एक संधी देऊन आमच्या नगराध्यक्षासह १० नगरसेवक उमेदवारांना सभागृहात पाठवावा. तसेच, मुरूडच्या विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केलं आहे. तसेच, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अंकीता मनिष माळी या वकील आहेत. अन्य उमेदवारदेखील उच्च शिक्षित आहेत. त्यामुळे जनतेने त्यांचा विचार करावा, असे आवाहनही यावेळी चित्रलेखा पाटील यांनी केले.

मूरूडमधील प्रभाग क्रमांक ४ अ मधील नगरसेवकपदाचे उमेदवार अनंत शंकर म्हसळकर यांच्या प्रचाराचे आयोजनक करण्यात आले होते त्यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

या प्रचारावेळी पक्षांचे निवडणूक निरीक्षक मधुकर ढेबे, अलिबाग माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, जगदीश भोसले, नगराध्यक्षपदाचे उमेदवार अंकिता माळी, शैलेश काते, दिपक म्हसळकर, विजय म्हसळकर, सुप्रिया म्हसळकर, धनश्री म्हसळकर, राजपुरकर, प्रतिक्षा म्हसळकर, ऋतुजा कोतवाल, शैला काते, ज्योती म्हसळकर, श्रद्धा लक्ष्मण म्हसळकर आदींसह शेतकरी कामगार पक्ष व महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, मुरूड शहरातील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते नेहमीच जनतेच्या सेवेसाठी चोवीस तास उपलब्ध असतात. त्यांचा समाजकारणात नेहमीच सक्रीय सहभाग असतो. प्रभाग ४ अ मधील शतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अनंत म्हसळकर यांना एकदा संधी द्यावी. त्यांचा या प्रभागात चांगला संपर्क आहे. या भागातील प्रश्नांना थेट उत्तर देण्यासाठी राजकारणाच्या माध्यमातून लोकसेवा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यात जगदीश भोसले सारखे जूने जाणते आक्रमक कार्यकर्ते सोबत असल्यावर विजय हा सोपा होणार आहे. मुरूड शहराचा सर्वांगीण विकास व्हावा हे डोळ्यासमोर ठेवून आम्ही या निवडणूक रिंगणात उतरलो आहोत. भविष्यात मुरूड शहराचा नियोजनबद्ध विकास करायचा आहे. त्यासाठी येथील मतदारांनी आमच्या शिलेदारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे. सभागृहात जाण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन शतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

### जनतेच्या हितासाठी उभा आहे -अनंत म्हसळकर

**प्रभाग क्रमांक ४ अ मधील नगरसेवकपदाचे उमेदवार अनंत म्हसळकर यांनी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील व शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचे उमेदवारी दिल्याबद्दल आभार व्यक्त करीत सांगितले की, चित्रलेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हाला शहराचा नियोजनबद्ध विकास करायचा आहे. त्यामुळे येथील जनतेने आमच्या पाठिशी ठामपणे उभे रहावे. आम्ही राजकारणात पैसा कमविण्यासाठी नाही तर जनतेच्या विकासासाठी आलो आहोत. जनतेच्या हितासाठी या निवडणूकीत उभा राहिलो आहे, असे मत यावेळी शेकाप पक्षाचे उमेदवार अनंत शंकर म्हसळकर यांनी व्यक्त केले.**



# अलिबागमधील राधेश्याम सोसायटीमध्ये आग

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरातील नगरपरिषदेसमोरील राधेश्याम सोसायटीला सायंकाळी अचानक आग लागली. या आगीत तळमजल्यावर असलेले सर्व मिटर जळून खाक झाले. शॉर्ट सर्कीटमुळे ही आग लागली असून सुदैवाने जिवीतहानी टळली. तात्काळ नगरपरिषदेच्या अग्नीशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग विझविली.

अलिबाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी नगरपरिषदेसमोर राधेश्याम नावाची सोसायटी आहे. हा परिसर संध्याकाळच्या वेळेला कायमच गजबजलेला असतो. गुरुवारी (दि.२७) सायंकाळी या सोसायटीमधून अचानक धूर येऊ लागला. ही बाब अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या लक्षात आल्यावर सामाजिक बांधीलकी जपत त्यांनी नगरपरिषदेच्या अग्नीशमन दलाला पाचारण केले. त्याचवेळेला शेकाप कार्यकर्त्यांनीदेखील घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला. तात्काळ मदत पोहचल्याने आग आटोक्यात आणण्यात यश आले. ही आग इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या वीज मीटरमध्ये लागली होती. शॉर्ट सर्कीटमुळे आग लागल्याची माहिती समोर येत आहे. सुदैवाने मोठी जिवीतहानी टळली.

## निवडक



### गावठी हातभट्टीवर धडक कारवाई

**चणेरा :** रोहा तालुक्यात अवैध गावठी दारू निर्मितीवर आळा बसवण्यासाठी रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व गोपिनय विभागाचे तडवी तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त माध्यमातून सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मळिाले आहे. तळाघर येथील गाईन जंगल परिसरात सुरू असलेल्या गावठी हातभट्टीचा अड्डा पोलिसांनी कौशल्यपूर्ण सापळा रचून उद्धवस्त केला. या कारवाईनंतर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. गुप्त माहितीच्या आधारे, निवी ठाकुरवाडी येथील काशीनाथ पुजारी हा जंगल भागात मोठ्या प्रमाणावर गावठी हातभट्टी चालवत असल्याचे समोर आले. तत्काळ पथकाने छापा टाकत आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी जप्त केलेला एकूण मुद्देमाल १ लाख ३० हजार रुपये किमतीचा असून त्यामध्ये ५ लोखंडी टाक्या, २ टाकीचे ड्रम, गुळ व साखर मिश्रित रसायन, ४० लिटर गावठी दारू, दारू साठवण्यासाठी वापरलेली रबरी ट्यूब असा मुद्देमाल मळिाला आहे. या प्रकरणी काशीनाथ पुजारी याला ताब्यात घेण्यात आले आहे. या धडक कारवाईत पीएसआय अविनाश पाटील, पोलीस हवालदार श्यामराव कराडे, लालासाहेब वाघमोडे, पोलीस शिपाई मोरेश्वर ओमले, बाबासो पिंगळे, ओंकार सोनकर हे अधिकारी उपस्थित होते.

### आरोग्य यंत्रणा चौकशीच्या भोवऱ्यात

**चिरनेर :** पेण तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या पाच डॉक्टरांचे घरभाडे व व्यवसाय रोध भत्ता अलीकडेच बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नखाते यांनी संबंधित डॉक्टर केंद्रावर राहत नसल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात पाठवल्यामुळे ही कारवाई झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या डॉक्टरांचे म्हणणे आहे की, ते नेमून दिलेल्या ठिकाणी सेवा बजावत असून, त्यांच्यावर झालेली कारवाई अन्यायकारक आहे. दरम्यान, या प्रकरणाची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच सत्य बाहेर येईल, अशी मागणी नागरिकांनीही केली आहे. स्थानिकांकडून मळिालेल्या माहितीनुसार, तालुका आरोग्य अधिकारी स्वतः पेण येथे वास्तव करत नसल्याच्या आणि अनेकदा वेळेवर उपस्थित नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. तसेच, डॉ. नखाते यांची पत्नी सध्या निलंबित असून, त्यांच्याशी संबंधित प्रकरणात हस्तक्षेप किंवा प्रभाव टाकण्याच्या दृष्टीने कामकाज होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, हे फक्त आरोप असून, त्याची पुष्टी सरकारी स्तरावर झालेली नाही. त्यामुळे स्थानिकांनी या सर्व प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून वास्तविकता स्पष्ट करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

### एक लाखाची ऑनलाईन फसवणूक

**नवीन पनवेल :** कामोठे येथील रितिका अलुवालिया यांनी घरातील जुने फ्रिज विक्रीसाठी ओएलएक्स या सोशल मीडियावर टाकले होते. त्यावेळी त्यांना समोरील व्यक्तीचे नाव संजय कुमार असून खारघर येथे फर्निचरचे दुकान असल्याचे सांगितले. आणि क्यू आर कोड पाठवतो, गुगल पे मधून स्कॅन करा आणि तुम्हाला ५ रुपये येतील, असे सांगितले. ती प्रोसेस केल्यानंतर ५ रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले. पुन्हा समोरील व्यक्तीने १०० रुपये पाठवले. यावेळी पुन्हा एक स्कॅनर पाठवला. तो स्कॅन केला असता रितिका यांच्या आईच्या खात्यातून १४ हजार ५०० वजा झाले. त्यानंतर पुन्हा स्कॅन करा असे सांगितले असता त्यांच्या आणि आईच्या खात्यातून एकूण १ लाख १२ हजार ३०० रुपये वजा झाले. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे.



# मविआच्या उमेदवारांना सर्वाधिक पसंती

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक आता रंगात आली असून प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकांनी, नगराध्यक्षानी आपला संपूर्ण परिसर पिंजून काढला आहे. महाविकास आघाडी तर्फे प्रभाग क्रमांक १० मधील नगरसेवकपदाचे उमेदवार ओमकार घरत, कमल पाटील, लता शेखर पाटील व नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी प्रभाग क्रमांक १० मधील संपूर्ण परिसर पिंजून काढला. प्रत्येक नागरिकांच्या घरी जाऊन या उमेदवारांनी प्रचार केला आहे. हे उमेदवार जनतेत मिळून व मिसळून राहणारे असल्याने जनतेचा, नागरिकांचा या उमेदवारांना प्रचारादरम्यान चांगला प्रतिसाद मळित आहे. जनतेत सर्वत्र महाविकास आघाडीचे उमेदवार बहुमताने निवडून येतील, अशी चर्चा सुरू आहे.

# दलाली करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा

## जितेंद्र आव्हाडांचे उरणकरांना आवाहन

**। उरण । प्रतिनिधी ।**

भावना घाणेकर ही माझी लढवय्यी बहीण आहे. ती कोणापुढे झुकणारी नाही. ती २४ तास जनतेसाठी उपलब्ध असते. त्यामुळे तिला भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी उरणकरांना व्हिडिओ कॉलद्वारे केले.

यावेळी आव्हाड यांनी स्थानिक आमदारांवर थेट निशाणा साधत विचारले की, गेल्या दहा वर्षांत उरणमध्ये नेमका काय विकास केला? एखादे ठोस काम उरणकरांसमोर दाखवता येईल का? आमदारांना जेएनपीटीची दलाली करण्याशिवाय दुसरे काही काम दिसते का? असे अनेक सवाल त्यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, आजच्या राजकारणात पैसा,



विक्री, गद्दारी यांनाच महत्त्व मिळत आहे. निती, मूल्य, तत्त्वं या शब्दांची किंमत उरलेली नाही. उरणकरांनी या पैशाच्या राकारणाला थारा देऊ नये. तसेच, समाजात असा समज आहे की, राजकारणात स्त्री तेव्हाच पुढे जाते जेव्हा तिचा नवरा शक्तीशाली असतो. मात्र, भावना घाणेकर हा त्या समजाला खोडून काढणारा धडा आहे. तिच्या मागे उरणची जनता, शरद पवार, सुप्रिया सुळे, आमचा पक्ष आणि सर्व समविचारी पक्षांची ताकद आहे, असेही आव्हाड यांनी सांगितले.

दरम्यान, उरणच्या मस्जिद मोहल्ल्यात मविआ आणि समविचारी पक्षांच्या उमेदवारांची सभा पार पडली. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी पुन्हा व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. यावेळी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी आमदार महेश बालदींवर तीव्र निशाणा साधला. त्या म्हणाल्या की, उरणची कन्या यशश्री शिंदेचा मृत्यू झाल्यानंतर मंत्री नितेश राणे मुस्लिम समाजाला टार्गेट करत होते. त्यावेळी उरणचे आमदार एक शब्द बोलले नाहीत; मुस्लिम बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याची हिंमत दाखवली नाही. आता मात्र निवडणूक लागली म्हणून मुस्लिम मतांसाठी उर्दूमध्ये 'दावत'ची पत्रके काढून राजकारण सुरू केले आहे. हा दांभिकपणा उरणकरांनी ओळखावा. तसेच, भाजप संपूर्ण देशभर 'बटेंगे तो कटेंगे' म्हणत सम ाजाला विभागत आली आहे. परंतु, उरणमध्ये आम्ही 'जुडेंगे तो बढेंगे' या विचाराने सर्व समाजांना साथ घेऊन विकासाचा मार्ग तयार करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

# तांदळात आढळल्या अळ्या, लेंड्या

### ■ शासनाविरोधात नागरिकांमधून संताप व्यक्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

शासनाकडून वाटप करण्यात येणारे धान्य हे नागरिकांना खाण्यासाठी देण्यात येत असते. परंतु, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे या तांदुळांमध्ये वारंवार अळ्या व उंदराच्या लेंड्या सापडण्याच्या घटना घडत आहेत. अशातच श्रीवर्धन शहरातील प्रभू आळी परिसरात असणाऱ्या रास्त भाव धान्य दुकानातील तांदळामध्ये अळ्या व उंदराच्या लेंड्या आढळून आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

शासनाकडून वितरित करण्यात येणारे धान्य रास्त भाव धान्य दुकानदार नागरिकांना वितरित करत असतो. या दुकानदाराकडे धान्य आल्यानंतर त्याचे वितरण त्वरित सुरू करण्यात येते. त्यामुळे हे धान्य दुकानदाराच्या दुकानात



जास्त दिवस पडून नसते. त्यामुळे शासकीय गोदामांमध्ये ठेवण्यात येणारे धान्य हे सुरक्षित रहावे. याबाबत प्रशासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. कारण शासकीय धान्य गोदामात आल्यानंतर गोदामांची झालेली दुरावस्था, त्यामुळे या परिसरामध्ये घुशी व उंदीर मोठ्या प्रमाणात घुसून धान्याची नासाडी करत असतात. तर, अनेक वेळा गोदामात आलेले धान्य हे जास्त जुने झाल्यामुळे त्यामध्ये अळ्या देखील पडतात. त्यामुळे आलेल्या धान्याची तपासणी करूनच ते वितरण करण्यासाठी पाठवावे, अशी मागणी नागरिकांमध्ये केली जात आहे. या प्रकाराबाबत महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांजवळ भ्रमणध्वरीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता अधिकाऱ्यांनी फोन उचलला नाही. महसूल विभागातील अधिकारी श्रीवर्धन नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे काम करण्यामध्ये व्यस्त असले तरी त्यांनी पत्रकारांनी केलेले फोन उचलावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# आगरदांडा रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील आगरदांडा ते नांदले रोह्याकडे जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर काही प्रमाणात अपघात घडत असून याकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबद्दल वाहनचालक व नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

पावसाळ्यापासून या रस्त्यावर खड्डे पडले असून या ठिकाणी काही जणांना अपघाताला सामोरे जावे लागले आहे. याबाबत येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी बांधकाम खात्याकडे वेळोवेळी रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केलीआहे. परंतु, याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसून येते आहे. संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष



पुरवून आगरदांडा गावातून नांदले रोह्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे बुजवून डांबरीकरण करावे, अशी मागणी सरपंच आशिष हेदुलकर, उपसरपंच संतोष पाटील, सदस्य युसुफ अर्जबेगी, सुहेल अर्जबेगी, प्रसाद भाटकर, सुर्यकांत तोडणकर, नरेंद्र हेदुलकर, समीप अडुळकर, वाहनचालक व ग्रामस्थ यांनी केली आहे.

# तळाकरांचा प्रवास खडतर

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा-अलिबाग ही एसटी बस नियमित चालणारी व उत्तम उत्पन्न देणारी आहे. ही अलिबाग येथे जाणारी एकमेव बस अत्यंत सोयीची आहे. मात्र, गेल्या महिनाभरापासून रोहा-अलिबाग मार्गावरील पुलाच्या दुरुस्ती कामामुळे ही बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे ही बसासेवा रोहापर्यंत चालवली जाते. त्यामुळे तळा पंचक्रोशीतील प्रवाशांना इंदापूर, वडखळ-अलिबाग असा प्रवास करावा लागत आहे. तसेच, वेळेचा अपव्यय व आर्थिक नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे ही बस सद्यस्थितीत रेवदंडा-साळाव किंवा नागोठणे-पोयनाड मार्गाने सुरु करावी, अशी मागणी प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.

परिवहन खात्याचे जाणिपूर्वक दुर्लक्ष | प्रशासनाच्या उदासीनतेवर नागरिकांमध्ये संताप

# रेवदंडा बस स्थानकाची दुरवस्था

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा एस.टी. बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असून प्रवाशांसह वाहन चालकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानक परिसरात मोठमोठे खड्डे, बस येताना बसणारे धक्के, बेशिस्त वाहने, अस्वच्छता आणि गुटख्याच्या दुर्गंधीने अक्षरशः प्रवासी त्रस्त झाले आहेत. त्यामुळे प्रशासनाचे दुर्लक्ष व परिवहन विभागाची उदासीनतेवर नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

अलिबाग, मुरूड व रोहा या तीन तालुक्यांना जोडणाऱ्या मध्यवर्ती ठिकाणामुळे रेवदंडा एसटी स्थानकात दररोज मोठी



प्रवासी वदर्ळ असते. या ठिकाणी पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचून निर्माण झालेली तळी आता कोरडी पडल्याने खड्ड्यांचे भयावह रूप स्पष्ट दिसत आहे. एसटी बस येताना प्रवाशांना धक्कादायक झटके बसतात. चालकांना हे खड्डे चुकविताना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत असून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यातच, बसस्थानक परिसरात लहानमोठी वाहने बेशिस्तपणे उभी करून ठेवली जातात, त्यामुळे स्थानकात एसटीला उभी करण्यासाठी देखील जागा मिळत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून बस चालकांना स्थानकात प्रवेश करणे कठीण झाले आहे. त्यामुळे ही बेशिस्त पार्किंग प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करणारी ठरत आहे. त्यातच बस स्थानक परिसरात अस्वच्छता देखील मोठ्या प्रमाणत वाढत आहे. गुटख्याच्या पिचकाऱ्या, थुंकलेल्या जागा आणि दुर्गंधीने हा परिसर भरून गेलेला आहे. त्यामुळे प्रवासी विशेषतः महिला, मुले आणि वृद्धा बसस्थानकाच्या आत बसणे टाळून बाहेरच थांबणे पसंत करतात. बाराही महिने रेवदंडा परिसरात देशांतर्गत व परदेशी पर्यटक येत असतात; परंतु, बसस्थानकाची ही बिकट अवस्था रेवदंडाच्या प्रतिमेला तडा देणारी ठरत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

### शासनाची संशयास्पद भूमिका

रायगड जिल्ह्यातील ९० टक्के एसटी स्थानकांचे कॉंक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. परंतु, रेवदंडा एसटी स्थानकाचे काम मागे का राहिले, हा सवाल प्रवासी वर्ग सातत्याने विचारत आहेत. परिवहन खाते आता मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे आहे. मात्र, त्यांचे रेवदंडा बसस्थानकाडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असून शासनाची संशयास्पद भूमिका असल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, प्रवाशांच्या सुरक्षिततेसह परिसरातील घाण, खड्डे आणि पार्किंगचा अराजक तेची जबाबदारी कोण घेणार? रेवदंडा एसटी स्थानकाचा विकास नेमका कुठे अडला? या सर्व प्रश्नांची उत्तरे परिवहन विभागाने तातडीने द्यावीत, अशी नागरिकांकडून जोरदार मागणी होत आहे.

# गौतम गंभीरला घालवा

भारताचा कसोटी क्रिकेटमध्ये आफ्रिकेविरुध्द झालेला पराभव अत्यंत लाजिरवाणा आहे. या मालिकेतले दोन्ही सामने आपण वाईट रीतीने हरलो आहोत. क्रिकेट किंवा कोणत्याही खेळात हारजीत चालूच राहते. यापूर्वी सचिन, द्रवीड, गांगुली यासारखे भलेभक्कम खेळाडू असूनही आपण हरलो आहोत. पण आपल्याच देशात आपला इतका दारुण पराभव अलिकडे झाला नव्हता. किंबहुना, भारताला भारतात हरवणे हे अत्यंत कठीण आहे हे सर्व देश मान्य करीत असत. पण गेल्या वर्षी न्यूझीलंडने आपल्याला तीन विरुध्द शून्य अशी दणकावून मात दिली आणि आता आफ्रिकेचा तुलनेने नवखा संघ आपल्याला भारी पडला आहे. या संघात कसिगो रबाडा, एबी डिव्हिलियर्स यांच्यासारखे खेळाडू नव्हते. तरीही कर्णधार बव्हुमाचा संघ शानदारपणे जिंकला. त्यांची फलंदाजी, जलद गोलंदाजी आणि फिरकी सर्व काही चालले. त्याच वेळी आपले वीर मेणासारखे वितळून गेले. न्यूझीलंडविरुध्दच्या मालिकेत गौतम गंभीर हाच प्रशिक्षक होता. पण तेव्हा तो नुकताच आला होता. त्यामुळे त्याला सहानुभूतीचा फायदा मिळाला. पण आता तो स्थिरावला आहे. तरीही हा पराभव झेलावा लागला आहे. याला बऱ्याच प्रमाणात गंभीरच जबाबदार आहे. त्याने गेल्या काही काळात भारतीय क्रिकेट संघाशी जे खेळ चालवले आहेत त्यामुळेच ही नामुष्की ओढवली आहे. प्रत्येक प्रशिक्षकाचे काही गुणदोष असतात. गंभीर हा बेडर आहे. त्याचा खेळाडूंना फायदा होत असेल. पण तो तितकाच हट्टी व हेकेखोरही आहे. नीतीशकुमार रेड्डी, साई सुदर्शन, ध्रुव जुरैल किंवा कुलदीप यादव हे त्याचे आवडते खेळाडू आहेत. त्यांनाच तो वारंवार संधी देतो. इंग्लंडच्या दौऱ्यात जुरैल वगळता यातील इतरांची कामगिरी उंचसखल किंवा कधी बरी कधी चांगली अशी राहिली. तिच्यात सातत्य नव्हते. तरीही त्यांना पुन्हा पुन्हा संधी मिळत राहते. याउलट विराट कोहली, रोहित शर्मा इत्यादींसोबत जुळवून घेणे त्याला जड जात असल्याने त्यांना याने निवृत्त होण्यास जवळपास भाग पाडले आहे. इतर काही तरुण खेळाडूंनाही त्याने चांगली कामगिरी करून दूर ठेवले आहे.

## अष्टपैलू खेळाडूंचा हव्यास

आफ्रिकेविरुध्दच्या दोन कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघातील खेळाडूंनी सरासरी सोळा धावा केल्या. त्याच वेळी आफ्रिकेतील खेळाडू मात्र सहज धावा करीत होते. कोलकात्यामध्ये भारतीय संघाच्या फायद्यासाठी म्हणून फिरकीला अनुकूल खेळपट्टी करून घेण्यात आली. पण त्यावर आपले गोलंदाज चाललेच नाहीत. उलट आफ्रिकेच्या महाराज व इतर फिरकीपटूंनी कमाल केली. कोलकाता आणिगुवाहाटीत सायमन हार्मरचा ऑफ ब्रेक तुफान चालला. पण वॉशिंग्टन सुंदरला एखादा बळी मिळाला. कोलकात्यात अक्षर पटेल फेल कमी पडला म्हणून त्याला गुवाहाटीत थेट काढूनच टाकण्यात आले. पण त्याच्याऐवजी आलेला रेड्डी फेल गेला. त्यांच्या डावखुऱ्या वेगवान मार्को यानसेनने आपल्याला हैराण केले. पण तरीही आपण बुम बुम बुमरावरच सर्व भिस्त ठेवून आहोत. अर्शदीप वगैरेंना घेण्याचा विचार करीत नाही. गंभीर आता म्हणतो आहे की हा संघ अननुभवी आहे व शिकतो आहे. पण यातले जडेजा, बुमरा, के.एल राहुल, पंत, कुलदीप हे चांगलेच अनुभवी आहेत. यशस्वी जयस्वाल किंवा वॉशिंग्टन सुंदर हेही आता इंग्लंड व ऑस्ट्रेलियात चांगले खेळलेले खेळाडू आपल्याकडे आहेत. साई सुदर्शन किंवा रेड्डी हेच त्यातल्या त्यात नवखे आहेत. गंमत म्हणजे नेमके तेच गंभीरचे आवडते आहेत व त्यांची कामगिरी ठीक नसूनही त्यांना वारंवार संधी मिळते आहे. याउलट करुण नायर, सर्फराज खान यासारख्या खेळाडूंना जेमतेम एकदोन सामन्यांमध्ये घेऊन वगळले जाताना दिसते. गंभीरचे वैयक्तिक रागलोभ वा आवडीनिवडी जपण्यासाठी भारतीय संघ नाही. पण हे वारंवार दिसले आहे. दुबईत चॅम्पियन्स चषकात आपण जिंकलो तेव्हाही गंभीरने खेळाडूंबाबत अशीच मनमानी केली होती. तेव्हा वॉशिंग्टन सुंदरची फिरकी वापरण्यातच आली नाही. शेवटी वापरली तेव्हा त्याने बळी मिळवून दिला. आता कोलकात्यात हाच सुंदर फेल गेला ही बाब वेगळी. पण त्याची संघातील भूमिका नक्की काय याबाबतच गोंधळ आहे. अष्टपैलू म्हणवल्या जाणाऱ्या खेळाडूंना अधिक खेळवणे हा गंभीरचा फंडा आहे. पण अगदी ऑस्ट्रेलिया व इंग्लंडच्या बलाढ्य संघातही असे मोजके एक-दोनच खेळाडू असतात. गंभीर मात्र चार-पाच जणांना खेळवू पाहतो. हेच आपल्या अंगाशी येत आहे.

## संघातील अंदाधुंदी

कोलकात्याची आखाडा खेळपट्टी आणि आपला संघ यांचा काहीच ताळमेळ नव्हता. गंभीरला खेळपट्टीचा अंदाज घेता येत नाही अशी टीका वारंवार होते. त्यामुळे त्याची खेळाडूंची निवड चुकते. साई सुदर्शनला पहिल्या कसोटीत खेळवले गेले नाही. त्या कसोटीत फक्त फलंदाज असे म्हणता येतील असे गिल, राहुल, जयस्वाल व जुरैल इतकेच होते. त्यातही जुरैलला घेतले फलंदाज म्हणून, पण खेळवले सातव्या क्रमांकावर. वॉशिंग्टन सुंदरला चौथ्या क्रमांकावर पाठवले. एकूणच खेळाडूंचा क्रम गंभीरच्या मनाला येईल तसा बदलला जातो. कप्तान गिल दुखापतीमुळे कोलकाता कसोटीतूनच बाद झाला. मुळात तोही नवखा आहे. त्याच्या जागी आलेल्या पंतचे कसोटीतील स्थान नक्की नाही. अशा स्थितीत गंभीरला जाब अडवू शकेल असा संघात कोणीच नाही. यामुळेच भारतीय संघ आता कसोटीच्या गुणवारीत पाकिस्तानच्याही खाली घसरला आहे. आफ्रिकेचा संघ गेल्या बारा कसोटीमध्ये एकदाही हरलेला नाही. याच संघाने कसोटी क्रिकेटचे जागतिक अजिंक्यपद जिंकले होते. तरीही भारताला भारतात हरवावे इतका काही तो बलाढ्य नाही. पण आपण बहुदा इंग्लंडला टक्कर देऊन आल्याने हवेत होतो. त्यातच आशिया चषकातील विजयाने आपल्या डोक्यात हवा गेली. वास्तविक त्या स्पर्धेत पाकिस्तानसकट सर्व संघ अत्यंत दुय्यम होते. त्यामुळेच आपण जिंकू शकलो. आपल्या देशात आता टीट्वेंटी आणि आयपीएल यांना अतोनात महत्व आले आहे. दोनचार षटके टाकावीत, वीस-तीस धावा फटकाव्यात आणि काही कोटी रुपये घेऊन जावे अशी खेळाडूंची मनस्थिती होऊ लागली आहे. खेळपट्टीवर टिकाव धरून खेळण्याची सवयच गेली आहे. प्रदीर्घ काळ गोलंदाजी करू शकणारे गोलंदाज उरलेले नाहीत. बुमरासारखा खेळाडू मनाला येईल तेव्हा ब्रेक घेतो. शमीसारख्यांना आपण खेळवत नाही. ऋतुराज गायकवाड यांच्यासारख्या तरुणांना आपण संधी द्यायला तयार नाही. यशस्वी जयस्वाल एक सामना चांगला खेळून नंतर बेजबाबदार फटके मारत असेल तर त्याला कडक भाषेत समजावणारे कोणी नाही. यापूर्वी पृथ्वी शॉसारख्यांनी अशाच बेफिकिरीने आपले करियर वाया घालवले. प्रशिक्षक म्हणून गंभीर याने सर्वांना सांभाळणे, आवश्यक तेथे कानउघाडणी करणे व समतोल विचार करून संघ बांधणे हे अपेक्षित आहे. पण ते घडताना दिसत नाही. बीसीसीआय ही जगातील सर्वात श्रीमंत संघटना आहे. त्या पैशांचा आपण माज करतो. पण आपला संघ मात्र आपल्याच देशात कसोटीत सलग दोन मालिका वाईट रीतीने हरतो. हे चित्र चांगले नाही.

विचार

# विमानतळाजवळ रिअल इस्टेटचे चांगभले

***नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन होऊन दोन महिने झाले. २५ डिसेंबरपासून या विमानतळावरून आकासा आणि इंडिगोच्या विमान वाहतूक सेवा सुरू होणार आहेत. त्याअगोदरच विमानतळाच्या जवळ रिअल इस्टेटच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. अनेक कंपन्यांनी या परिसरात गुंतवणूक सुरू केली आहे. बुलेट ट्रेन, मेट्रोने विमानतळ जोडले जाईल, तेव्हा नव्या मुंबईचे स्वरुप खऱ्या अर्थाने बदललेले असेल.***



**प्रा. सुखदेव बखळे**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे आजूबाजूच्या परिसरात जमीन आणि घरांची मागणी वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्घाटन झाले. त्यानंतर या विमानतळाच्या बाकी राहिलेल्या कामांना गती आली. सध्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. अजून काही टप्पे पूर्ण होणे बाकी आहे. हे विमानतळ मुंबईच्या दोन्ही जुन्या विमानतळांशी जोडले जाणार आहे. नवी मुंबई विमानतळावरून पुण्याच्या दिशेने येणारा साडेतीन हजार कोटी रुपयांचा आणखी एक रस्ता तयार होत आहे. याशिवाय विमानतळाला जोडणारे कल्याणसह अन्य ठिकाणचे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. बुलेट ट्रेन विमानतळाजवळील परिसरातून जात आहे. त्यामुळे एकात्मिक गतिमान वाहतुकीचा कॉरिडॉर नव्या मुंबईत तयार होत आहे. या सर्वांचा परिणाम नवी मुंबई परिसराच्या विकासावर होत आहे. त्यामुळे रिअल इस्टेटलाही चांगले दिवस आले आहेत. पहिल्या व्यावसायिक उड्डाणापूर्वीच रिअल इस्टेटच्या किमती गगनाला भिडत आहेत. 'अॅनारॉक रिसर्च' या संस्थेच्या अभ्यासानुसार उळवे, पनवेल, तळोजा आणि खारघरमधील जमिनीच्या किमती गेल्या काही काळात ५०-६० टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर घरांच्या किमती २०-४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. विमानतळाची उभारणी सुरू असल्यापासून निवासी आणि व्यावसायिक जागांच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. विमानतळ असलेल्या उळवेमध्ये निवासी किमतींमध्ये सर्वाधिक ४० टक्के वाढ झाली आहे, तर खारघरमध्ये या कालावधीत २० टक्के वाढ झाली आहे.

अॅनारॉक प्रॉपर्टी कन्सल्टंट्सचे अध्यक्ष अनुज पुरी यांच्या म्हणण्यानुसार पुढील दोन वर्षांमध्ये जमिनीच्या किमतीमध्ये ३० ते ४० टक्के अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे. बहुतेक कॉर्पोरेट कंपन्यांनी नवी मुंबई विमानतळाजवळील जमिनी आधीच विकत घेतल्या असल्याने जमिनीच्या किमतीत आणखी वाढ झाल्यास विमानतळाच्या प्रभावक्षेत्रातील एकूण मालमत्तेच्या किमतींवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. 'स्क्वेअर यार्डस' या रिअल इस्टेट कंपनीचे प्रमुख भागीदार आणि मुख्य विक्री अधिकारी दीपक खंडेलवाल यांनी या परिसरातील किमतीत वाढ आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. राज्य सरकारने नवी मुंबई परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. तिसरी मुंबई नवी मुंबईनजीक असल्याने अगोदर नवी मुंबई परिसरात विकासाचा वेग वाढला आहे. राज्य सरकारबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांनी या परिसराच्या विकासाचा नियोजनबद्ध आराखडा तयार करून व्यवस्थित अंमलबजावणी केल्यामुळे शहराच्या अंतर्गत भागात वाहतुकीच्या कोंडीसह अन्य समस्या येत नाहीत. आर्थिक वर्ष २०२१ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान पनवेल परिसरातील घरांच्या किमती सुमारे ७४ टक्क्यांनी वाढून दहा ते बारा हजार रुपये प्रति चौरस फूट झाल्या आहेत, तर नवी मुंबईतील उर्वरित भागात घरांच्या किंमतीत ४५ टक्के वाढ झाली आहे. या भागात मालमत्तेची किंमत १९ ते वीस हजार रुपये प्रति चौरस फूटपर्यंत गेल्या आहे. नवी मुंबईबरोबरच विकसित झालेल्या अन्य उपनगरांच्या आणि मालमत्तांच्या किंमतीपेक्षा या किंमती जास्त आहेत.

पनवेल भागाचे उदाहरण घेतल्यास भूखंडाचे दर सरासरी ऐंशी हजार ते ८५ हजार रुपये प्रति चौरस यार्डपर्यंत पोहोचले आहेत. त्यात झालेली ९३ टक्के वाढ ही सर्वाधिक आहे. नवी मुंबईच्या इतर भागांमधील दरांमध्ये ५८ टक्के वाढ झाली आहे. तिथे किंमती जास्त आहेत. पूर्णपणे कार्यरत झाल्यावर देशातील सर्वात मोठे विमानतळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन जवळ येताच प्रॉपर्टी डेव्हलपर्सनी अनेक प्रकल्प सुरू केले. गेल्या तीन वर्षांमध्ये नवी मुंबईत सुमारे ४५ दशलक्ष चौरस फूट निवासी जागा सुरू करण्यात आल्या. त्यापैकी सुमारे ६७ टक्के जागा फक्त चार प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांनी दिल्याचे अॅनारॉकने म्हटले आहे. या कालावधीत मुंबईत २८२ दशलक्ष चौरस फूट जागेवरील नव्या प्रकल्पांना सुरुवात झाली आहे. 'अनेक मोठे विकासक या भागात महत्वाकांक्षी निवासी प्रकल्प सुरू करत आहेत. त्यामुळे खारघर, पनवेल, उळवे आणि तळोजा ही प्रमुख निवासी केंद्र बनली आहेत', असे श्री. पुरी यांनी सांगितले.

द गार्डियन्स रिअल इस्टेट अॅडव्हायझरीचे सह-संस्थापक आणि सीईओ राम नाईक यांना उळवेसारख्या प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांमध्ये मालमत्तेच्या मागणीत अनेक पटींनी वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे म्हटले आहे. पूर्वी संभाव्य विकसनशील क्षेत्र म्हणून गणला जाणारा हा परिसर आता उच्च-मागणीच्या कॉरिडॉरमध्ये रूपांतरित होईल. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, आगामी मेट्रो लाईन्स आणि सायन-पनवेल महामार्ग विस्ताराद्वारे सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे संपूर्ण पट्ट्याला दक्षिण मुंबई आणि ठाणे या दोन्ही ठिकाणी जलद प्रवेशाचा फायदा होईल. गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून, नवी मुंबई त्याच्या सुवर्ण टप्प्यात प्रवेश करत आहे, असे ते म्हणाले.

पुढील काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात निवडक ठिकाणी २० ते ३० टक्के भांडवलवाढ होऊ शकते. दर्जेदार प्रकल्प आणि वेळेवर अंमलबजावणीची क्षमता असलेले विकासक त्याचा सर्वाधिक फायदा घेऊ शकतात, तर खरेदीदारांना मुंबईतील संतृप्त बाजारपेठांच्या तुलनेत दीर्घकालीन मूल्य जास्त मिळेल. सीबीआरईचे भारत, आग्नेय आशिया, मध्य पूर्व आणि आफ्रिकाचे अध्यक्ष आणि सीईओ अंशुमन मॅगझिन यांच्या माहितीनुसार नवी मुंबई विमानतळाचा शहराच्या रिअल इस्टेटवर, विशेषतः विमानतळाच्या आसपासच्या भागात, परिवर्तनकारी परिणाम होईल. विमानतळ कर्मचारी, कार्यरत व्यावसायिक आणि विमान वाहतूक कर्मचाऱ्यांच्या गरजांमुळे विमानतळाभोवती निवासी जागांची मागणी वाढण्याची शक्यता आहे, तर लॉजिस्टिक्स पार्क, कार्यालये आणि हॉटेल्सच्या विकासामुळे व्यावसायिक मागणी वाढण्याची शक्यता आहे. मालमत्ता विकासक किमती वाढण्याबाबत तितकेच उत्साही आहेत. किमती स्थिर होण्यापूर्वी नजीकच्या भविष्यात त्या आणखी २०-२५ टक्के वाढतील. नवी मुंबई परिसरात ज्या भागात किमती वाढल्या नाहीत, त्या आता वाढतील.

वाधवा ग्रुपचे एमेरिटस अध्यक्ष विजय वाधवा म्हणाले, की खारघरसारखी ठिकाणे आता महाग झाली आहेत. अलिकडेच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जद्वारे संचालित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने पनवेलमधील वाधवा वाईज सिटी या टाउनशिप प्रकल्पात वाधवा ग्रुपकडून ४०५ 'रेडी टू मूव्ह इन' फ्लॅट्स भाड्याने घेतले आहेत. चांगल्या सुविधांसह निवासी संकुलांना येथे चांगली मागणी आहे. आमच्या मते येथे काम करणाऱ्या लोकांकडून एकूण परिसराला खूप मागणी येईल. पनवेल, खारघर आणि उळवेचा विकास नवी मुंबई ३.० च्या उदयोन्मुख दृष्टिकोनाशी खोलवर जोडलेला आहे, जो या प्रदेशाला मुंबईच्या संरचित शहरी विस्तारात रूपांतरित करत आहे. नवी मुंबईचे ऑफिस मार्केट म्हणून असलेले धोरणात्मक स्थान, विमानतळाद्वारे वाढलेली कनेक्टिव्हिटी आणि जागतिक प्रवेश यामुळे पुढील काही वर्षांमध्ये या भागात ऑफिस भाडेपट्ट्याने देण्याचा व्यवसाय आणि भाडीही वाढण्याची शक्यता आहे. विमानतळाशेजारी प्रस्तावित ६६७ एकर नवी मुंबई एरोसिटी कारकिर्दीच्या संधी आणि जीवनशैलीचे मिश्रण करणारी एक नवी शहरी परिसंस्था वाढवेल. नवी मुंबई विमानतळ या परिसरातील पाच-दहा किलोमीटर भागाच्याच विकासाला हातभार लावेल असे नाही, तर शेजारच्या रायगड जिल्ह्यातील काही भागांच्या आणि प्रामुख्याने तिसऱ्या मुंबईच्या विकासात महत्वाचे योगदान देईल.

# राज्यघटना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आधार

**सुयोग आंग्रे**

यावर्षी २६ नोव्हेंबर रोजी भारतीय राज्यघटनेला ७६ वर्षे पूर्ण झाली. काही चढ-उतार असूनही, संविधानाने देशाचे प्रजासत्ताक, संघराज्य आणि लोकशाही स्वरूप मजबूत केले आहे. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका यांसारख्या अनेक देशांमध्ये अनेकवेळा संविधान बदलले गेले आणि नवीन संविधाने बनवली गेली, तरीही भारतीय जनतेचा आपल्या संविधानावर विश्वास कायम आहे. संसदेने १०६ घटनादुरुस्ती करून कायदा आणि सामाजिक विकास यांच्यातील समन्वय राखला आहे. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी राज्यघटनेची केलेली छेडछाड बाजूला ठेवली, तर संविधान निर्मात्यांच्या अपेक्षेप्रमाणेच राज्यघटना कार्यरत आहे, असे म्हणता येईल. संविधान दिनानिमित्त संसदेच्या सेंट्रल हॉलपासून इतर ठिकाणी आयोजित केलेले विविध कार्यक्रम संविधानाचे महत्त्व अधोरेखित करतात.

हे कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात कारण मोदी सरकारने २०१५ मध्ये दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी राष्ट्रपतींनी आपली राज्यघटना ही राष्ट्राची पायाभरणी आणि राष्ट्रवादी विचार अंगीकारण्यासाठी मार्गदर्शक दस्तऐवज असल्याचे प्रतिपादन करतानाच पंतप्रधानांनी स्वतःचे पंतप्रधान पदापर्यंत पोहोचणे ही संविधानाची ताकद असल्याचे सांगितले. याला काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश बी.आर.गवई यांनी संविधानामुळेच आपण या पदावर पोहोचलो असे सांगून दुजोरा दिला होता. संविधानाचा संदर्भ देत पंतप्रधानांनी देशवासियांना लिहिलेल्या पत्रात त्यांच्या नागरी जबाबदाऱ्यांची आठवण करून दिली, त्याकडे लक्ष दिले पाहिजे कारण देशाला विकसित बनवण्याचे स्वप्न तेव्हाच पूर्ण होऊ शकते जेव्हा प्रत्येकजण आपल्या हक्कांसोबतच आपल्या जबाबदाऱ्यांबाबत जागरूकता दाखवेल. संविधानाप्रती असलेल्या समर्पणाच्या विविध अभिव्यक्तींमध्ये, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ज्या प्रकारे त्यावर कोणताही हल्ला सहन केला जाणार नाही, असे सांगितले, त्यावरून ते पुन्हा एकदा संविधान धोक्यात असल्याचा मुद्दा उपस्थित करू इच्छित आहेत. संविधान धोक्यात आहे असे म्हणणाऱ्यांनी असे करून राज्यघटना कमकुवतच नाही तर तिचा अनादरही केला हे समजून घेतले पाहिजे. किंबहुना राज्यघटनेपुढे जर काही धोका असेल तर तो त्याच्या मनमानी अन्वयार्थाचा आहे. राज्यघटना एक आहे हे विचित्र आहे, पण त्याचा अर्थ वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. असे झाल्यावर लोकांमध्ये संशय निर्माण होतो. राज्यघटनेतील तरतुदी दगडात लिहिल्याप्रमाणे मांडल्या जात असल्याचा नवा ट्रेंडही पाहायला मिळत आहे. राज्यघटना हा जिवंत दस्तावेज आहे आणि त्यामुळेच सर्व पक्षांच्या सरकारांनी त्यात वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत. राज्यघटनेत कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करणे हा गुन्हा आहे, असे भासवले जात आहे. लोकांची दिशाभूल करण्यासाठी हा केवळ खोटा प्रचार आहे. काय झाले पाहिजे की, विविध क्षेत्रांतील सुधारणांची उरलेली पावले राज्यघटनेच्या भावनेनुसार लवकरात लवकर उचलली जावीत, यावर पक्ष आणि विरोधी पक्षांचे एकमत झाले पाहिजे. केवळ राजकीय, प्रशासकीय, न्यायिक आणि आर्थिक क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक क्षेत्रातही सुधारणांची गरज आहे. समान नागरी संहितेचा अजेंडा अद्याप अपूर्ण आहे आणि आरक्षणाचे लाभ पात्र लोकांपर्यंत पोहोचणे बाकी असल्याने याकडे दुर्लक्ष केले नाही तर बरे होईल. हे विषय नुसते बोलून चालणार नाहीत, तर कृतीतूनही दाखवले पाहिजेत. लोकशाही ही सरळ रेषेत चालणारी घटनात्मक व्यवस्था नाही. मतभेद, टीका आणि विरोध हे त्याचे अपरिहार्य घटक आहेत. त्यामुळे लोकशाहीतील संघर्षांमुळे निर्माण होणारी सामाजिक-राजकीय उष्णता ही नकारात्मकता म्हणता कामा नये.

सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, प्रादेशिक आणि भाषिक विविधतेमुळे, भारताने आपल्या लोकशाही सभ्यता आणि संस्कृतीचा अविभाज्य घटक म्हणून मतभेद, टीका आणि विरोध स्वीकारला आहे. राज्यघटनेच्या जटिल भाषेचे सुलभीकरण विकसित राष्ट्रासाठीही आवश्यक आहे. राज्यघटनेची भाषा केवळ कायदेतज्ज्ञ, वकील आणि न्यायाधीशच नाही तर सर्वसामान्य नागरिकांनाही संविधान वाचता येईल आणि समजेल अशी असावी. राज्यघटना आणि कायदे सुलभ करणारे सरकार आणि न्यायपालिकेचे अनेक उपक्रम झाले हे खरे, पण संविधानाप्रती आदराची भावना असूनही सर्वसामान्य नागरिक आणि संविधान यांच्यात अजूनही खूप अंतर आहे. राज्यघटनेचा हा आदर अबाधित राहण्यासाठी आणि संविधानिक संस्थांवरील जनतेचा विश्वास दृढ राहण्यासाठी विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांनी आपापल्या जबाबदाऱ्या लक्ष्मणरेषा ओळखून भारतीय संस्कृती आणि मूल्ये लक्षात घेऊन त्यांचे कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. तरच भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही तसेच सर्वोत्तम लोकशाही बनू शकेल.

लोकसंसद

## कर्नाटकात सत्ता संघर्ष शिगेला : नेतृत्व बद्दल होणारं

कर्नाटकात काँग्रेस सरकार अस्तित्वात येवून अडीच वर्षे होत आहेत त्यामुळे राज्यात मुख्यमंत्री फेरपालटासाठी सत्ता संघर्ष शिगेला पोहोचला आहे कर्नाटकच काँग्रसचे फायरब्रँड नेते, प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे सीएमच्या रेसमध्ये आहेत त्यामुळे त्यांच्या समर्थक आमदारांनी दिल्लीवाऱ्या करत डी. के. मुख्यमंत्री व्हावेत यासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांच्याकडे इच्छा प्रकट केली आहे याचं पार्श्वभुमीवर शिवकुमार यांनी देखिल विविध नेत्यांच्या, आमदारांच्या गाठीभेटी घेवून सल्लामसलत केल्याचे वृत्त समोर आले आहे कर्नाटक राज्यातील डी. के. शिवकुमार यांच्याकडे एक आक्रमक नेता म्हणून पाहिले जात आहे कर्नाटकात काँग्रेसची सत्ता स्थापन करण्यात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे कर्नाटक सरकारला अडीच वर्षे पूर्ण व्हायला मुख्यमंत्री बदलाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे त्यामुळे या वृत्ताला अधिक बळकटी मिळत असून कर्नाटक सरकारचे नेतृत्व लवकरच बदलले जाण्याचे संकेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्याची बातमी आहे श्रीमती सोनिया गांधी परदेश दौऱ्यावर असल्याने त्या २९ रोजी दिल्लीत परतणार आहेत त्यामुळे त्या आल्यानंतरच सर्वकाही ठीकठाकं होणारं आहे इकडे डीसीएम शिवकुमार यांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे विद्यमान मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राज्यांमध्ये अनेक कल्याणकारी योजना राबवून आपला ठसा उमटविला आहे विशेष करुन पंचहमी योजना गेमचेंजर ठरली आहे यापूर्वी देखील काँग्रेसच्या काळात सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला होता त्यांनी आपल्या राजकीय कौशल्यामुळे विरोधकांचे आव्हान परतून लावले आहे ते एक उच्चशिक्षित सीएम म्हणून गणले जातात हे जरी खरे असले तरी आता उपमुख्यमंत्री डी. के.यांना मुख्यमंत्रीपद बहाल करणे हे सिद्धरामय्यांचे आद्यकर्तव्य आहे त्यामुळे आगामी काळात राज्यांत कोणकोणत्या घडामोडी घडतात ते पहाणे महत्वाचे ठरणारं आहे !

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# थोर विचारवंत, समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे, तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्ती हे या समाजाचे घोषवाक्य होते. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात



शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले; त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. हे केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे.

महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य-स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे, असे त्यांचे रोखठोक मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# समृद्ध पंचायतसाठी नेतृत्व प्रशिक्षण



**। खांब । प्रतिनिधी ।**

सुदर्शन केमिकल कंपनीच्या सुदर्शन सीएसआर फाऊंडेशनच्या सीएसआर प्रमुख माधुरी सणस यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली गावपातळीवरील समृद्ध पंचायतसाठी नेतृत्व सशक्त करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अनुषंगाने आयोजित या प्रशिक्षणात ग्रुप ग्रामपंचायत गोवे, खांब आणि तलवळी तर्फे अष्टमी या ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी, जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक, अंगणवाडी सेविका- मदतनिस तसेच तिन्हीही गावातील गाव कमिटी अध्यक्ष आणि मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षणाचे मार्गदर्शन प्रसिद्ध सामाजिक प्रवक्ते किशोर काळोखे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन सुदर्शनचे कार्यकारी अधिकारी अमर चांदणे व संग्राम पाटील यांनी केले. तर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता वातेरे यांनी केले. शेवटी आभारप्रदर्शन मनोज शिर्के यांनी केले.

# उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय

**भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत**

**कलम १९ ची अधिसुचना**

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त अधिनियम' असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक २६/१२/२०२४ अन्वये कलम ११ ची अधिसुचना प्रसिध्द केली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी 'पुनर्वसाहत क्षेत्र' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**
**जमिनीचे वर्णन**

**गाव : पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | न.भू.क्रं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | १३०५/ब | ९०.३४ |
| २ | १३०९/० | ३.०० |
| ३ | १३१८ | २.५४ |
| ४ | १३१९/२ | १.०० |
| ५ | १३१९/३ | |
| ६ | १३१९/४ | |
| ७ | १३१९/५ | |
| ८ | १३१९/६ | |
| ९ | १३१९/७ | |
| १० | १३१९/८ | |
| ११ | १३२३/१ | १.०० |
| १२ | १३२३/२ | १.८० |
| १३ | १३२५ | ३.८३ |
| १४ | १३२५/१ | ५.३० |
| १५ | १३२६ | ६.८८ |
| १६ | १३३२ | १२.९८ |
| १७ | १३३३/अ | ५.३० |
| १८ | १३३३/ब | |
| १९ | १३३३/क | |
| २० | १३४८/ब/१ | ३६.५३ |
| २१ | १३४८/ब/२ | |
| २२ | १३५४/३ | |
| २३ | १३४६/ब/४ | |
| २४ | १३४८/ब/५ | |
| २५ | १३४९/० | ६८.९० |
| २६ | १३५१/१ | ४७.४७ |
| २७ | १३५२/० | ५७.०० |
| २८ | १३५४/१/अ | ११५.९० |
| २९ | १३५५/० | ४.५० |
| ३० | १३५६/अ | ६२.०० |
| ३१ | १३५६/ब | |
| ३२ | १३५८+१४२४ | ६१.९० |
| ३३ | १३५९/० | १३.४४ |
| ३४ | १३५९/१ | १३.८४ |
| ३५ | १३७३/० | ४१.६२ |
| ३६ | १३९०/क | ६०.५८ |
| ३७ | १३९०/ड | |
| ३८ | १३९१/० | १६३.८८ |
| ३९ | १३९३/ब | संपूर्ण |
| ४० | अ.मू.क्र. १३० | न. भु. क्र. प्रमाणे २५८.०० |
| | एकुण | ११३९.४० चौ.मी. |

**अनुसूची– दोन**

अधिसूचना :- प्रकल्पाचे नाव :- मौजे पनवेल, ता. पनवेल येथील राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते सावरकर चौक) ११३९.४० चौ.मी. रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठी.

निर्गमित :- प्रकल्प कार्याचे वर्णन :- मौजे - पनवेल, ता. पनवेल येथील राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते सावरकर चौक) न.भू.क्रं. १३०५/अ ते अ.भू.क्र.१३० संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र ११३९.४० चौ.मी. रस्ता रुंदीकरण बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

करण्यापूर्वी :- समाजाला मिळणारे लाभ :- पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी :- निरंक
कारणे

**अनुसूची–चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :- मौजे पनवेल, ता. पनवेल राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते सावरकर चौक) ११३९.४० चौ.मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. भूसंपादन कायदा २०१३ च्या तरतूदीस अधीन राहून जमिनी संपादन करणे प्रस्तावित करण्यांत आले आहे. या जमिनी संपादन केल्यामुळे केवळ ४० खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाहीत. संपादीत करावयाच्या जमिनी पिकाखाली नाहीत. पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदीनूसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.
सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- २५/११/२०२५

सही/-
**(पवन चाडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

# BY THE SUB DIVISIONAL OFFICER PANVEL, SUB DIVISION PANVEL

**NOTIFICATION OF SECTION 19 UNDER RIGHT TO GET APPROPRIATE COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION, RESETTLEMENT ACT 2013**

Whereas, the District Collector of Raigad District, with proper governance, is entitled to appropriate compensation for land acquisition, rehabilitation and resettlement, and by sub- section (1) of section 11 of the Right to Transparency Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred to as the Act) by using the powers, the notification, dated 26/12/2024, has been drawn in the initial notification and by that notification is made, along with a detailed description of the land done more in the attached Schedule A, Schedule two requires or is likely to require a more detailed specific public purpose.

And, after considering the report given by sub-section (2) of section 15, if any, by the Collector of Raigad District, it is convinced that the said land needs to be acquired for the said public purpose. Therefore, under the provisions of sub-section (1) of section 19 of the said Act, it is hereby declared that the said land is required for the public purpose.

And whereby the areas described in more detail in Schedule III are designated as Rehabilitation Areas for the purpose of rehabilitation and rehabilitation of the affected families, the summary of the Rehabilitation and Resettlement Scheme is specified in Schedule Four

AND WHEREAS, the District Collector under Clause (c) of Section 3 of the said Act is deputing the Suh Divisional Officer Panvel, Sub Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act;

**Schedule-1**
**Description of the Land**
**Village :- Panvel, Tal.:- Panvel, District :- Raigad**

| Sr.No. | C.T.S. No. | Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 1 | 1305/B | 90.34 |
| 2 | 1309/0 | 3.00 |
| 3 | 1318 | 2.54 |
| 4 | 1319/2 | 1.00 |
| 5 | 1319/3 | |
| 6 | 1319/4 | |
| 7 | 1319/5 | |
| 8 | 1319/6 | |
| 9 | 1319/7 | |
| 10 | 1319/8 | |
| 11 | 1323/1 | 1.00 |
| 12 | 1323/2 | 1.80 |
| 13 | 1325 | 3.83 |
| 14 | 1325/1 | 5.30 |
| 15 | 1326 | 6.88 |
| 16 | 1332 | 12.98 |
| 17 | 1333/A | 5.30 |
| 18 | 1333/B | |
| 19 | 1333/C | |
| 20 | 1348/B/1 | 36.53 |
| 21 | 1348/B/2 | |
| 22 | 1354/3 | |
| 23 | 1346/B/4 | |
| 24 | 1348/B/5 | |
| 25 | 1349/0 | 68.90 |
| 26 | 1351/1 | 47.47 |
| 27 | 1352/0 | 57.00 |
| 28 | 1354/1/A | 115.90 |
| 29 | 1355/0 | 4.50 |
| 30 | 1356/A | 62.00 |
| 31 | 1356/B | |
| 32 | 1358+1424 | 61.90 |
| 33 | 1359/0 | 13.44 |
| 34 | 1359/1 | 13.84 |
| 35 | 1373/0 | 41.62 |
| 36 | 1390/C | 60.58 |
| 37 | 1390/D | |
| 38 | 1391/0 | 163.88 |
| 39 | 1393/B | All |
| 40 | अ.मू.क्र. १३० | As Per C.T.S. No. 258.00 |
| | TOTAL | 1139.40 |

**Schedule-11**

Notification: Name of the project : Ram Ganesh Gadkari Marg (Adarsh Hotel to Savarkar Chowk) at Mauje-Panvel, Taluka Panvel, 1139.40 sq.m. for road widening purpose.

Summary of Social Impact Assessment: Ram Ganesh Gadkari Marg (Adarsh Hotel to Savarkar Chowk) Plot No. 1305/A to Plot No. 130 Total area as per the property mentioned in the joint return is 1139.40 sq.m. Road widening is necessary for speedy construction.

**Schedule-III**

Compelling the displacement of the affected person: Nil

**Schedule-IV**

Summary of Social Impact Assessment: Mauje-Panvel, Taluka-Panvel Ram Ganesh Gadkari Marg (Adarsh Hotel to Savarkar Chowk) 1139.40 sq.m. in Panvel, Taluka Panvel, subject to the provisions of the Land Acquisition Act 2013.
The acquisition of these lands Only 40 account holders are being affected and the account holders are not being displaced. The lands to be modified are not under crop.
The industrial importance and urbanization of Panvel city as well as Since the development and expansion is happening at a rapid pace, there is no need for a Social Impact Assessment Study as per the provisions of Sections 9 and 40 of the Land Acquisition Act, 2013 in the public interest.
This land acquisition process should begin as soon as possible.
The amendment to chapter III under Close 10 A of the LAAR (Maharashtra & Annendment) Act 2018.

Place: Panvel
Date: 25/11/2025

Sd/-
**(Pavan Chandak)**
**Sub Divisional Officer Panvel**
**Sub Division Panvel**

## निवडक




### पं.स. कार्यालयात संविधान दिन

**नवीन पनवेल :** पंचायत समिती पनवेल कार्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला. गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी सहाय्यक गट विकास अधिकारी राजेंद्र कोलटक्के, पशुधन विकास अधिकारी आनंद मारकवर, गटशिक्षण अधिकारी शाहू सतपाल तसेच गुलाब बहिरम सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पूर्ण स्टाफ उपस्थित होता. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या ठिकाणी संविधान फोटो फ्रेम ठेवण्यात आली होती. गटविकास अधिकारी यांनी संविधानाबाबत आपले विचार व्यक्त केले. चेतन गायकवाड यांनी संविधान शपथ वाचन केले व त्यांच्या मागून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी संविधान शपथ घेतली. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला आणि त्यामध्ये शहीद झालेल्या शहीद लोकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### विजयश्री पाटील यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार



**नवीन पनवेल :** साने गुरुजी संस्कार साधना पुणे या संस्थेने विजयश्री राजेंद्र पाटील यांना २३ नोव्हेंबर रोजी आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पनवेल तालुक्यातील शांतीवन येथील अण्णासाहेब सहस्रबुद्धे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेत विजयश्री राजेंद्र पाटील या शिक्षिका आहेत. २००० पासून त्या सेवेत रुजू होऊन २५ वर्षे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत. तालुक्यातील आदिवासी समाजातील ठाकूर जमातीच्या स्त्रियांचे जीवन, आदिवासी भागातील पाणीटंचाई, आदिवासी स्त्रियांमध्ये सिकलसेल एक गंभीर समस्या या विषयावर अभ्यासपूर्ण शोध निबंध त्यांनी लिहीले आहेत. तसेच जिल्ह्यातील आदिवासी समाजातील स्त्रियांच्या जीवनमानावर शिक्षणाचा झालेला परिणाम या विषयावर संशोधन कार्य सुरू आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



### सुधागड एज्युकेशन सोसायटीला आदर्श शाळा पुरस्कार

**उरण :** चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू यांच्या नेतृत्वाखाली नऊ वर्षे समाजसेवेचे उपक्रम राबवत आहे. आज आदर्श शाळा तालुका हा उपक्रम हाती घेऊन रायगड जिल्हातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळा निवडत आहे. त्याप्रमाणे पनवेल तालुक्यामधून सुधागड एज्युकेशन सोसायटी या शाळेला पनवेल तालुका आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार मिलिंद खारपाटील यांच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका गावित यांनी स्वीकारला. या कार्यक्रमास संतोष तांबोळी, संतोष गायकर, वैभव गायकर, ज्येष्ठ नागरिक सीताराम म्हात्रे यांची उपस्थिती होती. तर, शाळेतर्फे नूतन जगताप, बाळासाहेब सोलासे, प्रकाश पाटील, लक्ष्मण इगोले, सुप्रिया लांडगे, जयसिंग थोरात, संतोष पाटील, सुनील निकुंभ, वैशाली पाटील, संगीता मगरे, जाकीरहुसेन मान्सूरी व कर्मचारी उपस्थितीत होते.

### सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे शहिदांना श्रद्धांजली

**खरोशी :** २६ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी काळा दिवस ठरलेला असल्याने मुंबई अतिरेकी हल्ला आणि त्यात मृत्युमुखी पडलेल्या ३४ परदेशी नागरिकांच्या सहित एकूण १९७ जण मारले गेले आणि ८०० हून अधिक जखमी झाले असा हा शहिदांना श्रद्धांजली वाहण्याचा दिवस. आज या दिवसाचे औचित्य साधून सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान तर्फे महात्मा गांधी वाचनालय पेण येथे शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, समीर म्हात्रे, अरविंद वनगे, सुहास पाटील, अशोक मोकल, प्रविण पाटील यांच्यासह पेणकर, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Driver पाहिजे ८०८७५७२७४७
- नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वतःची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७
- नागाव येथे घरी राहून कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल.सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555
- विकणे आहे - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- कॉम्प्युटर ग्राफीक्स डियायनर, डिटीपी ऑपरेटर व मशिनवर काम करण्यासाठी मुले/मुली पाहिजेत. स्लॅष ग्राफिक्स, अलिबाग ९८२३६५०५५१
- अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट ,गोंधळपाडा, रेवस बायपास , विद्यानगर परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्कंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे मो. ७७५८९७५४०७
- फिशिंग मच्छिमारी व्यवसायासाठी सेकंडहॅण्ड ३५० ते ४०० पॉवर इंजिन असलेली बोट विकत घेणे आहे

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# शेतकऱ्यांच्या समस्यांना केराची टोपली

## शेतकऱ्यांचे तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन



> वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्थाच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले. मात्र, आम्ही शेतकरीवर्गास सहकार्य करतो. तसेच फोन रिसिव्ह करून मार्गदर्शन करतो. त्याचबरोबर सर्व योजना ऑनलाईन असून, गटाला बियाणे वाटप केले जाते. त्याचबरोबर आंबा फवारणी अनुदान लवकरच देण्यात येईल, तसेच शेतकरीवर्गासाठी मार्गदर्शन हे रामेतीमध्ये घेण्यात येत असते.
>
> – **सुनील निंबाळकर**, तालुका कृषी अधिकारी, खालापूर

**■ शासनाच्या योजनेचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांस मिळणार नसल्याने खंत व्यक्त**

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील शेतकरी भातशेतीबरोबर दुय्यम पिके घेत असतात. मात्र, तालुका कृषी अधिकारी शेतकरीवर्गाकडे पाठ फिरवत असल्याचा आरोप वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्था, खालापूर यांच्या वतीने करण्यात आला. तालुक्यातील असलेल्या शेतकरी संस्था शेतकरीवर्गासाठी कृषीविषयक कार्यक्रम घेत असतील, तर कृषी विभाग कार्यक्रम का घेत नाही, असा सवाल सध्या उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात तालुका कृषी अधिकारी शेतकरी समस्यांबाबत केराची टोपली दाखवत असल्यामुळे याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

शेतकरी समस्या बाबद तालुक्यातील कृषी अधिकारी यांना फोन करून किंवा व्हॉट्सअ‍ॅपला मेसेज करूनसुद्धा कृषी विभागाकडून सातत्याने टाळाटाळ केली जाते. त्याचबरोबर सध्या रब्बी हंगाम सुरू असून, फक्त बियाणे गटांनाच दिले जाणार असल्याचे म्हणणे आहे. यामुळे किती शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे शासनाच्या योजनेचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांस मिळणार नसल्याचे व्यक्त केले जात आहे.

दरवर्षी आंबा पिकावर फवारणी करण्यासाठी ५० टक्के अनुदानावर औषधे मिळत होती. मात्र, यावर्षी अजूनही औषध आलेले नाहीत. तसेच चालू वर्षी भातपिकासाठी सापळे आले होते, ते तालुका कृषी विभागामध्ये पडून असल्यामुळे शेतकरीवर्गास केव्हा त्यांचा लाभ मिळणार असल्याचे बोलले जाते. पूर्वी असलेल्या कृषी अधिकारी,यांनी खालापूर तालुक्यामध्ये कृषी विषयक विविध कार्यक्रम हाती घेतले होते. मात्र, आता ते होत नाही, अशी खंत शेतकरी व्यक्त करीत आहेत. सदर निवेदन हे विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे, कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे, आमदार कर्जत-खालापूर विधानसभा, तालुका कृषी अधिकारी खालापूर-खोपोली आदींना देण्यात आले आहे.

# म्हसळ्यात महायुतीत तणाव



## स्वागत रॅलीत राष्ट्रवादीने दाखवले काळे झेंडे

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात काही दिवसांपूर्वी घडलेल्या राजकीय घडामोडीत म्हसळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षांसह आठ नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरत गोगावले यांचा उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता. या प्रवेशामुळे खासदार सुनील तटकरे यांना धक्का बसला होता. त्यानंतर दोन दिवसांनी लगेच खा. सुनील तटकरे यांनी राजकीय शह देत शिवसेनेच्या तालुका प्रमुखासह महिला आघाडी, विभाग प्रमुख, शहरप्रमुख यांचा प्रवेश घेऊन शिवसेनेला आव्हान दिले होते.

राष्ट्रवादीतून शिवसेनेत गेलेल्या नगराध्यक्ष आणी नगरसेवकांचा सत्कार आणि स्वागत रॅली पेट्रोलपंप ते नगरपंचायत कार्यालयापर्यंत मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत काढण्यात आली.

परंतु, रॅली नगरपंचायत कार्यालयासमोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवून जोरदार घोषणा दिल्या. यावेळी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनीसुद्धा घोषणाबाजी केली. त्यामुळे काहीकाळ बाजारपेठेत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून म्हसळा पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात बंदोबस्त लावण्यात आला होता.

## पोलीस प्रशासन सज्ज...



● निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून अलिबाग शहरात पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस रूट मार्च करण्यात आले. छायाचित्र : समीर मालोदे

## क्षमता विकास प्रशिक्षणवर्गाचा समारोप



**। उरण । प्रतिनिधी ।**

यू.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये सात दिवसीय क्षमता विकास प्रशिक्षण वर्गाचे दि. १० ते २४ नोव्हेंबर या कालावधीत दोन बॅचमध्ये आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा समारोप समारंभ सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोत्कृष्ट डॉक्टर पुरस्कार सन्मानित डॉ. सत्या ठाकरे यांना आमंत्रित केले होते. त्यांच्यासोबत राष्ट्रपती पदक विजेते, निवृत्त नागरी संरक्षण दल अधिकारी आणि नोडल अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय रायगडचे मनोहर म्हात्रे, निवृत्त सहाय्यक उपनियंत्रक एच.एम. भोईर, सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाठ, केंद्र सरकारचे कांस्यपदक विजेते व विभागीय वॉर्डन उरण तालुक्याचे हरेश्वर ठाकूर, नागराज शेठ सीबीएसई आंतरराष्ट्रीय शाळेच्या प्राचार्या आणि सिव्हिल डिफेन्सच्या मास्टर ट्रेनर ज्योती म्हात्रे तसेच सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मीनाक्षी गुप्ता व विभाग प्रमुख, शिक्षकवर्ग, शिक्षेकतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर सिव्हिल डिफेन्सच्या काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच पाच दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाला सहभागी झालेल्यांपैकी प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यातील काही विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण कार्यक्रमातील अनुभव सांगितले. तर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अशा प्रकारे यू.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये सात दिवसीय क्षमता विकास प्रशिक्षण वर्गाचा समारोप समारंभ संपन्न झाला.

## माणगावात शहिदी समागम कार्यक्रम



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

त्याग आणि समर्पणाचे प्रतीक हिंद-दि-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त विशेष कीर्तन आणि गुरु का लंगर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि.२९ नोव्हेंबर २०२५ सकाळी ९ ते सायंकाळी ४ यावेळेत गांधी मैदान, एच.पी.पेट्रोल पंपशेजारी मुंबई-गोवा महामार्ग, नाणोरे फाटा, माणगाव याठिकाणी होणार आहे.

या समागम कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक रायगड सिख सेवा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यावतीने करण्यात आले आहे. माणगाव शहरातील नागरिकांनी एकत्र येऊन भव्य स्मरणोत्सवाचे आयोजन केले आहे. या दिवशी सकाळी ९.३० वाजता श्रीगुरु ग्रंथ साहिब यांचा प्रकाश, सकाळी १० ते १२ सुखमणी साहिब पाठ (बिबियां दा जथा पुणे) चहा आणि पकोडा लंगर, १२ ते १.३० गुरु तेग बहादूर साहेबांचा इतिहास, १.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत 'सरबत दा भला' अरदास व गुरु का लंगर वाटप असे कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, गुरविंदर सिंह सोडी, वरिंदर सिंग बर्मन, गुरुविंदर सिंह भाटिया व सहकारी परिश्रम घेत आहेत.

# शिक्षण म्हणजे सर्जनशीलतेचा सुंदर संगम

## प्रा. डी.एम.पवार यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

आपल्या संकुलातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात गेल्या वर्षभरात उल्लेखनीय काम केले आहे. वार्षिक स्नेहसंमेलन हा या सर्व विद्यार्थ्यांचा गौरवाचा दिवस आहे. आपल्या बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलात राबविलेल्या विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. विद्यार्थ्यांनीही त्यामध्ये चांगली कामगिरी करून आपल्या शाळेचे, शिक्षकांचे व पालकांचे नाव उज्ज्वल केले. ईश्वराने प्रत्येकाला कोणती शक्ती दिली असून, त्याची जाणीव ठेवून ती शक्ती आत्मसात करा आणि शिक्षण म्हणजे नीतीमूल्ये, आत्मविश्वास व सर्जनशीलता यांचा सुंदर संगम आहे, असे मार्गदर्शन अग्रवाल विद्यामंदिर व एस.पी. जैन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डी.एम. पवार यांनी विद्यार्थ्यांना केले.

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील अग्रवाल विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम बुधवारी (दि.२६) संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. दिनेश भगत, प्रा.डॉ. संदेश गुरव, अ. जे. जैन प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा लोखंडे, वार्षिक स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्ष भरत भांगरे, उपकार्याध्यक्ष आबेसिंग गावित, सकाळ सत्र प्रमुख नेताजी गायकवाड, दुपार सत्र प्रमुख रमेश जेडगे, निवृत्त चित्रकला शिक्षक भास्कर सोलेगावकर आदींसह शिक्षक व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या रांगोळी, चित्रकला व विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्र. प्राचार्य डी.एम. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धा पार पडल्या. नंतर झालेल्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात पहिली ते १२ वीपर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याचदरम्यान शाळेच्या 'आविष्कार' या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघना म्हात्रे व देवयानी पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळ व दुपार सत्रातील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

**बाळाराम पाटील यांचे प्रतिपादन | दत्तूशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचा रौप्य महोत्सव उत्साहात**

# विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती हेच ध्येय



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

माजी आमदार दत्तूशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या रौप्यमहोत्सव वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची सुरुवात आज नितलसच्या शाळेपासून करत आहोत, याचा आनंद होतो. विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती हेच ध्येय आहे, असे प्रतिपादन बाळाराम पाटील यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, या संस्थेची निर्मिती १९९५ साली करण्यात आली. शिक्षण म्हणजे प्रगती नसून, त्याचबरोबर विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती करणे हेच खरे उद्दिष्ट ठेवले आहे. या नितलसच्या शाळेची इमारत जुनी झाली आहे, तेव्हा ही इमारत थोड्याच दिवसात नवीन बांधण्यात येणार आहे. आणि, ही शाळा कोकणातील मधू मंगेश कर्णिक यांच्या शाळेसारखी निसर्गाच्या कुशीतील असेल. याबाबत जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्यासोबत चर्चा झाली आहे.

यावेळी पंढरीनाथ म्हात्रे, डी.बी. म्हात्रे, दत्ता भोपी, नितलस सरपंच संदीप पाटील, सरपंच मदन मते, सतीश धिवर, शाळेचे मुख्याध्यापक विजय म्हात्रे, मनसेचे पनवेल तालुका अध्यक्ष रामदास पाटील, काशिनाथ पाटील यांनी सांगितले की, या गावातील मुली सातवीच्या पुढे शिक्षण घेत नव्हत्या, कारण पुढील शिक्षणासाठी त्यांना पनवेल किंवा कळंबोलीला जावे लागत असे. ही गरज लक्षात घेऊन याच शाळेत दहावीपर्यंत शिक्षण मिळत आहे, याचा आनंद होत आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक विजय म्हात्रे यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांचा शिक्षणाबरोबर शारीरिक, मानसिक, बुद्धिमत्ता वाढवणे, हे आमचे ध्येय आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत गीते यांनी केले. यावेळी विविध शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.

## गुरुवारी दत्तजयंती उत्सव सोहळा



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील कोलाड येथील पोलीस ठाण्यात सालाबादप्रमाणे गुरुवार, दि.४ डिसेंबर रोजी दत्तजयंती उत्सव आयोजित करण्यात येणार आहे. यानिमित्ताने सर्व भाविकांनी उपस्थित राहून देवदर्शन व महाप्रसादाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन कोलाड पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक नितीन मोहिते तसेच कोलाड पोलीस अधिकारी, कर्मचारी वृंद यांच्याकडून करण्यात आले आहे.

# चाऱ्याच्या शोधात मेंढपाळांची भटकंती

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

ग्रामीण भागात तालुक्याच्या ठीकांणी मेंढपाळांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात आगमन जरी होत असले तरी सुद्धा चाऱ्याच्या आभावाने मोठ्या प्रमाणात भटकंती करावी लागते. हि वस्तूस्थिती सध्या पाताळगंगा ठिकाणी निर्माण झाली आहे.

पुर्वी कोकणात मोठ्या प्रमाणात चारा असायचे, मात्र, गेल्या काही वर्षात औद्योगिकरणांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरल्याने, शिवाय जंगले नामशेष होत असल्यामुळे, त्याच बरोबर पावसाला संपताच वणवे मोठ्या प्रमाणात लागले जात असल्यामुळे, या सर्व कारणावरुन मेंढ्यावर उपासमारीचे संकट निर्माण झाले आहे. त्याच बरोबर पिण्याच्या पाण्याच्या समस्या मोठ्या तिव्रतेने जाणवत आहे. पुर्वी माळरान आणी डोंगराच्या परिसरात काटेरी वनस्पती मोठ्या प्रमाणात असायचे, हेच अन्न म्हणून शेळ्या, मेंढ्या भक्षण करीत असे, यामुळे दुध उत्पादन वाढ होत होती. मात्र चाऱ्याच्या अभावाने आम्ही आर्थिक संकटात सापडत आहोत. पावसाळा संपताच घाटमाथ्या वरिल असलेले मेंढपाळ आपल्या जवळ असलेला लावाजावा घेवून कोकणात येत असल्याचे मेंढपाळांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री. प्रसाद बळीराम नाखवा व शुभांगी बळीराम नाखवा यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलामध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे खंडाळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

१)भूमापन क्रमांक व उपविभाग १३१ एकूण क्षेत्र ०.०१.०० हे.आर.चौ.मी., आकार रू. ०.२३ /- मात्र ही मिळकत.

२)भूमापन क्रमांक व उपविभाग १३३ एकूण क्षेत्र ०.१२.६० हे.आर..चौ.मी., आकार रू. १.४४ /- मात्र ही मिळकत.

सदरहु मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकती पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२७.११.२०२५

**श्री. अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळिवणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालकाने खालील नमुद मिळकत आमचे अशिलाना विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

**मौज सांडशी, ता. कर्जत, जि रायगड येथिल मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री. नारायण सटु शिर्के | ७/३ | ०-४२-५० यापैकी २० गुंठे क्षेत्र | १-२५ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत हक्क हितसंबंध सुध्दा.

ता. २८ नोव्हेंबर २०२५

खरेदीदारातर्फे
**कु. स्नेहल बंडु तुरडे**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफीस : गाळा नं. ९, विहंग अपार्टमेंट
कोतवाल नगर कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ७६२०२२३९५९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशिल १) श्रीमती सरस्वती गणपत गावंड, २) श्री. जयराम गणपत गावंड, ३) श्री. अनिल गणपत गावंड ४) अवधुत गणपत गावंड ५) प्रमिला रामचंद्र गावंड ६) प्रकाश रामचंद्र गावंड ७) सुभाष रामचंद्र गावंड सर्व रा. मु.पो. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांचा ताबा, कब्जा, वहिवाटीत व कसवणूकी मध्ये खालील वर्णन केलेली मिळकत आहे. सदर मिळकत आमचे आशिलांचे पूर्वापार ताबा, कब्जा, कसवणूकी मध्ये आहे. असे असताना सदर मिळकतीवर १) श्रीमती संगीता दत्तात्रेय पाटील, २) श्री. निलेश दत्तात्रेय पाटील, ३) सौ. सुवर्णा शैलेश मोहिते, ४) सौ. ज्योती दिलीप कदम, ५) सौ. प्रमिला नंदकुमार नाईक, ६) श्री अप्रेश चंद्रकांत भुजे, ७) सौ. तृप्ती किशोर लाड, ८) श्री. संतोष तुकाराम खारकर, ९) सौ. स्वप्ना जगदीश पाटील, १०) सौ. जयश्री चंद्रकांत रांजणकर, ११) श्री. नयन अजय खारकर, १२) सौ. अरुणा सहदेव हळदणकर, १३ सौअंकिता अशोक बागकर, १४) सौ. लता गजानन कुलपे, १५) श्री. महेंद्र हरिश्चंद्र सासवणेकर, १६) सौ. सुजाता ज्ञानेश्वर ठाकूर, १७) सौ. ज्योती जनार्दन नागवेकर, १८) सौ. प्रज्ञा प्रविण राऊत, १९) श्री. कैलास सुधाकर थळे, २०) श्री. शैलेश सुधाकर थळे, २१) श्री. योगेश सुधाकर थळे, २२) श्री. प्रदिप यशवंत कांबळे, २३) श्री. संदीप यशवंत कांबळे, २४) श्री. गणेश यशवंत कांबळे, २५) श्रीमती जयश्री मंगेश कांबळे, २६) श्री. यश मंगेश कांबळे, २७) सौ. दर्शना दत्ताराम पारकर, २८) सौ. कुंदा नारायण लेझे, २९) श्रीमती ममता शेखर नलावडे, ३०) कु. जुई शेखर नलावडे, ३१) श्री. अमर शशिकांत कोर्लईकर, ३२) श्री. आदेश शशिकांत कोर्लईकर, ३३) सौ. कावेरी कैलास थळे, ३४) सौ. आरती अप्रेश भुजे, ३५) श्री. जयवंत दत्तात्रेय पडवळ, ३८) सौ. उषा संतोष मुकाद, ३७) श्री. राजेंद्र दत्तात्रेय पडवळ, ३८) सौ. शमिका शेखर भाटकर, या सर्वांनी त्यांचा नावाची नोंद सदर मिळकतीवर बेकायदेशीर करून घेतलेली आहे. व त्याचाच फायदा घेऊन सदर मिळकत विक्री करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. याची माहिती आमचा अशिलाना नुकतीच मिळाली आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

गाव :- इंद्रपै, गट क्रमांक व उपविभाग २ क्षेत्र (हे.आर.) ०-३७-१०, पो. ख. ०-०६-१० एकुण क्षेत्र ०-४३-२० (हे. आर), आकार (रु.पै.) १०.६

वर वर्णन केलेल्या मिळकतीची विक्री करण्याच्या तयारीत आहेत असे आमचे अशिलाना खात्रीशिर समजले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या बाबतीत कोणीही खरेदी विक्री व्यवहार करु नये. सदर व्यवहार केल्यास आमचे अशिलांनवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी,

अलिबाग
दिनांक :- २७/११/२०२५

**ॲड. अतुल अनंत मयेकर,**
जिल्हा व सत्र न्यायालय
रायगड अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

दिनांक २७/११/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. प्रफुल्ल शांतीनाथ पत्रावली | १६३/२ | ११.५०.७५ | ११५.०८ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त मिळकतीचा जुना सर्व्हे नं. १४६/२अ+२ब+२क+२ड+१५१/५ हा जुना सर्वे नं असुन त्याचा नविन सर्वे नं १६३ चा प्लॉट नं २ आहे. उपरोक्त बिनशेती मिळकतीचा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी बिनशेती जमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही ताबा अगर, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा. पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९२७१८७६०५०

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे सायडोंगर, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक कविता कृष्णकांत पित्ती रा-६१० सिल्वर लीफ नांरगी बाग रोड, ऑफ बोट क्लब रोड, जॅक अन्ड जिल सोसायटी जवळ, पुणे पिन ४११००१ याची खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| सायडोंगर | ३२ | २ | लागवडी योग्य क्षेत्र - ०.९९.०० हे.आर.पॉ.<br>पो.ख. क्षेत्र - ०.०५.०० हे.आर.पॉ.<br>एकुण क्षेत्र - १.०४.०० हे.आर.पॉ. | ०.७२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक कविता कृष्णकांत पित्ती यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच सदरील व्यक्तीचा संस्थेचा, खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (०७) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी तसेच मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक : २७/११/२०२५

**ॲड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता-कर्जत जि-रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, मौजे-भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची जमिन मिळकत अ. वहाब शेख इस्माईल सौदागर, रा. मु. बोर्ली मांडला, पो. बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या मालकीची असून सदरील जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भोईघर, ता. मुरूड | १४५ | जिरायत ०-०६-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण क्षेत्र ०-०९-०० | ०.०५ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २७/११/२०२५

सही/-
**ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रे गल्ली, पो.आक्षी,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे लोधीवती, ता.खालापूर, जि.रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-लोधीवली, ता. खालापूर, जि. रायगड.**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| सुरेश शांताराम पवार<br>गणु काशिराम कदम<br>हेमंत यशवंत पवार<br>रेश्मा संजय पालांडे<br>नयना रवी खटावकर<br>सुशिला यशवंत पवार<br>सुमन परशुराम यादव<br>बळीराम नामदेव कदम<br>मधुकर नामदेव कदम<br>ताईबाई जनार्दन भोसले<br>अनिता अनंत फाबडे<br>राम नामदेव कदम<br>रुपाली चंद्रकांत जाधव<br>हर्षला हिरामण शेलार | ५४ | ३ | १-०४.९० | ०.६६ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार यांचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा ) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री. सुरेश शांताराम पवार वगैरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. २८/११/२०२५

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता:फ्लॅट नं.ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## पनवेल महानगरपालिका
## जाहिर सुचना
## महिला व बाल कल्याण विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, त्यांची व्यावसायिक व सामाजिक कौशल्ये वाढवण्याच्या उद्देशाने विविध प्रशिक्षण जाणीव व जागृती करणेकामी प्रशिक्षण देणेकरिता नमुद केलेल्या बाबीकरीता दिनांक ०२/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० पर्यंत बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या बेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र पमपा/मबाक/ १३८/२०२५
दिनांक : २७/११/२०२५

सही/-
**(महेशकुमार मेघमाळे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सुचना

निविदा सुचना क्र. पमपा/ बांधकाम/६६२५/प्र.क्र.०१/४५२१/२०२५ दिनांक: २७/११/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Centeral Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहिर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST ) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/२५५/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ खारघर येथील कोपरा तलाव (गणेश तलाव) लगत पादचारी पूल, संरक्षण भिंत व पावसाळी गटार बांधणे. | १,३०,८८,४४५/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या :'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २८/११/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त - I**
**पनवेल महानगरपालिका**

## Tender Notice

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/ GRN/ e-Tender/ T-11 / 2025-26 | Work Contract for Repairing and Maintenance work of Three Phase Transformer Distribution Boxes of various capacity at site and its allied works on "Turnkey basis under Goregaon Division (As per MSEDCL specification) | 25.00 | 25,000/- | 2500+18 % GST= 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 28.11.2025 to Dt. 07.12.2025. Submission of Bid is up to Dt. 08.12.2025 till 23.55 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO no. 267** **Executive Engineer, Goregaon Division.**

## e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| **Tend22 / 25-26 RFX 7000038258** | SITC, 22kV feeder for M/s BPCL plant Rasayani POL & BOT plants at 220kV Apta S/Stn under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 37,35,608.22** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 27.11.2025 to 12.12.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 12.12.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **फकी अर्शद अब्दुल गफूर आणि निलोफर अर्शद फकी** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मौजे साईगाव, तालुका मुरुड, जिल्हा रायगड येथील सर्व (१) गट क्रमांक २९५/२, क्षेत्रफळ ०४एच-०६आर-००पी, (२) गट क्रमांक २९५/३, क्षेत्रफळ ०२एच-००आर-००पी, आणि (३) गट क्रमांक २९५/४, क्षेत्रफळ ०२ एच-७४ आर-००पी, च्या शेतकी जमीन, दायाम्नी आणि मैदानाच्या (यात यानंतर '**सदर जमीन**' असा उल्लेख करण्यात आलेला आहे) संबंधातील हक्क विलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट- भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, धारणाधिकार, परीरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था,/ तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा न्यायालयीन आदेश, करार/ करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत पाठींबा देणाऱ्या सर्व दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर त्यांचा अधित्याग/ परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

मौजे साईगाव, तालुका मुरुड, जिल्हा रायगड येथील शेतकी जमीन, दायाम्नी आणि मैदानाचे खाली दिल्याप्रमाणे ते सर्व तुकडे आणि भाग :

(१) फकी अर्शद अब्दुल गफूर आणि निलोफर अर्शद फकी यांच्या नावातील गट क्रमांक २९५/२, क्षेत्रफळ ०३ एच -६८ आर -०० पी आणि एफ. एल. ०० एच -३८ आर -०० पी, एकूण क्षेत्रफळ ०४ एच -०६ आर -०० पी ची रु. ३.५७ ने निर्धारित केलेली आणि खालीलप्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक २९५/१, २९८ आणि २२१
दक्षिण दिशेकडे : बेलसई (गाव नागशेत) सीमा
पूर्व दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक २९५/३
पश्चिम दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक ३१०, ३२१, ३२२ आणि ३२३.

(२) निलोफर अर्शद फकी यांच्या नावातील गट क्रमांक २९५/३, क्षेत्रफळ ०१ एच -८१ आर -०० पी आणि एफ. एल. ०० एच -१९ आर -०० पी, एकूण क्षेत्रफळ ०२ एच -०० आर -०० पी ची रु. १.७६ ने निर्धारित केलेली आणि खालीलप्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक २९६,२९७ आणि २९८
दक्षिण दिशेकडे : बेलसई (गाव नागशेत) सीमा
पूर्व दिशेकड : साईगावातील गट क्रमांक २९५/४
पश्चिम दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक २९५/२.

(३) फकी अर्शद अब्दुल गफूर यांच्या नावातील गट क्रमांक २९५/४, क्षेत्रफळ ०२ एच -४८ आर -०० पी आणि एफ. एल. ०० एच -२६- आर -०० पी, एकूण क्षेत्रफळ ०२ एच -७४ आर -०० पी ची रु. २.४१ ने निर्धारित केलेली आणि खालीलप्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक २९८ आणि २९४
दक्षिण दिशेकडे : बेलसई (गाव नागशेत) सीमा
पूर्व दिशेकडे : साईगावातील गट क्रमांक २९५/५
पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक २९५/३ आणि बेलसई (गाव नागशेत) सीमा.

**आज दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५**

**नेहा सेहेगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट,
जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई-४०००२१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे रांजणखार, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व तसे करार उभयतांमध्ये स्वाक्षरीत करण्यात आले आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| रांजणखार | १९ | ०-०२-३० | ०.३३ | श्री.अनंत काशिनाथ म्हात्रे |

तसेच वर नमुद मिळकतीमध्ये येण्या-जाण्याकरीता खाली नमुद मौजे नारंगी येथील मिळकतींमधून कायम स्वरुपी वहीवाटीचा रस्ता कराराद्वारे घेण्याचे ठरविले आहे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| नारंगी | ८० | ०-१७-८०<br>पो.ख.०-०५-०<br>०-२२-८० | १.५३ | |
| नारंगी | ८३/१ | ०-०२-३० | ०.१७ | श्री. नारायण पांडुरंग पाटील यांच्या हिश्याच्या मिळकतीमधून ९ मीटर कायमस्वरुपी वहीवाटीचा रस्ता |
| नारंगी | ८३/३ | ०-१३-८०<br>पो.ख.०-००-५०<br>०-१४-३० | २.३८ | |
| नारंगी | ८३/१७ | ०-१५-८०<br>पो.ख.०-००-५०<br>०-१६-३० | २.२५ | |
| नारंगी | ८३/४ | ०-१४-७०<br>पो.ख.०-००-६०<br>०-१५-३० | २.५७ | |
| नारंगी | ८३/११/ १२/१३ | ०-२७-५०<br>पो.ख.०-०२-४०<br>०-२९-९० | ६.७० | श्री. विकास धनाजी पाटील, श्री. गोपाळ धनाजी पाटील व श्री. प्रकाश धनाजी पाटील यांच्या हिश्याच्या मिळकतीमधून ९ मीटर कायमस्वरुपी वहीवाटीचा रस्ता |
| नारंगी | ८३/१६ब | ०-३४-१०<br>पो.ख.०-०१-००<br>०-३५-१० | ९.०० | |
| नारंगी | ८३/१६अ | ०-०७-१०<br>पो.ख.०-००-२०<br>०-०७-३० | १.८७ | |
| नारंगी | ८३/५अ/ ६/७ | ०-२५-९०<br>पो.ख.०-०१-३०<br>०-२७-२० | ५.३२ | श्री काशिनाथ हिरु पाटील |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्यांना आपआपल्या मिळकतीतून वर नमुद केल्याप्रमाणे व्यवहार करण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल मौजे रांजणखार गट नं. १९ ही मिळकत खरेदी करतील व मौजे नारंगी स. नं. ८०,८३/१८३/३, ८३/१७, ८३/४, ८३/११/१२/१३, ८३/१६ब, ८३/१६अ व ८३/५अ/६/७ या मिळकतींमधून वहीवाटीच्या रस्त्याबाबत करार करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २८/११/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली भातशेती मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल श्री. प्रमोद मधुकर बोरसे यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या भातशेती मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत:-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र : हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| १. संतोष रमेश राऊत,<br>२. विशाल किसन शिनारे,<br>३.बाबाजी तुकाराम रसाळ,<br>४.मनसुर रामभाऊ गाडगे,<br>५. सुरेश नामदेव वाफारे,<br>६. गणेश नामदेव आंग्रे, | ७७/१ | ०-१८-००<br>पोटखराबा ०-०७-००<br>०-२५-०० | ०.२० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

पत्ता : देवपाडा, ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०१०१
ठिकाण: कर्जत

सही
**ॲड. रविंद्र मुरबे,**

दिनांक : २८/११/२०२५
मो.नं. ९६५७१९९८०१

I am changing my name from Madhura Rohan Raikar to Madhura Diwakar Apte for passport issuance

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# नि|व|ड|क



## रोहे शहरात पोलिसांचे पथसंचलन

**रोहा :** रोहा नगरपालिकेची निवडणुका येत्या २ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. या निवडणुका आणि मतमोजणी प्रक्रिया शांततेत व्हावी, या लोकशाही उत्सवाला कोणत्याही प्रकारे गालबोट लागू नये म्हणून रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली रोहे शहरात पोलिसांनी पथसंचलन केले. दरम्यान, रोहा येथील विविध पक्षांतील कार्यकर्ते आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत असताना अद्याप सर्वत्र शांतता दिसून येत आहे. निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपली असताना कॉर्नर सभा, रॅली, घरोघरी उमेदवार व कार्यकर्त्यांच्या प्रचाराला वेग वाढला आहे. आरोप प्रत्यारोपचे सिलसिले देखील सुरु आहेत. मात्र, भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली झाली आहे.




## आश्रमशाळेत संविधान दिन साजरा

**कोर्लई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारताच्या संविधानाचा गौरव दिन आज आपण साजरा करित आहोत. त्याचा आपणा सर्वांना सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन डॉ. जयपाल पाटील यांनी अलिबाग तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या कोळघर आश्रम शाळेत केले. यावेळी व्यासपीठावर आश्रम शाळेचे मुख्याध्यापक सतीश शेरेकर, अलिबाग तालुका अदिवासी संघटना अध्यक्ष धनाजी शिद, गंगोत्री म्हात्रे तसेच सुषमा म्हात्रे, स्वाती पाटील, अर्चना रामटेके,सुनिता गडखळ, प्रकाश तिवरे, दिनेश डोलकर, जगदीश मेंगाळ, तुषार घुमाळ, विकास रणपिसे, शिक्षक वृंद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशिकांत पवार तर सुनिता दांडेकर यांनी आभार मानले.




## संविधान गौरव दिन साजरा

**पाली/बेणसे :** बौद्ध समाज युवा संघ रायगड यांच्यावतीने रोहा येथे ारतीय संविधान गौरव दिन वैचारिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना म्हटले कि, २६ नोव्हेंबर हा भारतीय संविधानाचा गौरव दिवस. भारताचे संविधान आणि संविधान गौरव दिन सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, समाजवाद,लोकशाही प्रजासत्ताक मूल्यांची जगाला ओळख करून देणारा दिवस आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रहिताचा व्यापक दृष्टिकोन, त्यांचे महान कार्य, त्यांचे सामर्थ्य याची जाणीव करून देणारा दिवस आहे. भारत देशातील प्रत्येक नागरिकाला समान व मूलभूत हक्क मळिवून देणाऱ्या भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला मान, आत्मसन्मान व प्रतिष्ठा मळिवून दिली, असे मत यावेळी मांडले. या कार्यक्रमाला समीर शेडगे, यशवंत शिंदे, भगवान बिनेदार, गणपत इंगळे, धम्मशील सावंत, राजेंद्र जाधव, जयप्रकाश पवार, महेंद्र मोरे, संतोष गायकवाड, सुदाम वाघमारे, अशोक भंडारे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, धम्म बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सामूहिक व्रतबंध सोहळ्याची तयारी

**रोहा :** रोहा तालुक्यातील अष्टमी येथे त्वष्टा कांसार समाजाच्या सामूहिक व्रतबंध म्हणजेच मुंज हा सोळा संस्कार आत्मसात करण्याचा धार्मिक विधी सोहळा रविवारी (दि.३०) रोजी अष्टमी येथे करण्यात येणार आहे. यावेळी एकुण २६ बटु या सामुदायिक कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. अध्यक्ष हेमंत साळवी यांनी यापूर्वीही अशाच प्रकारचा उपक्रम केला आहे. त्यातुनच चांगला प्रतिसाद मळिाला म्हणुन याही वर्षी हा उपक्रम होत आहे. अर्थात ज्ञाती मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि विविध प्रकारच्या उत्सव समितीचे पदाधिकारी यांच्या सहकार्याने हा उपक्रम संपन्न होणार आहे. समाजाच्या विविध भागांतील समाजबांधवांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

## नांदगावमध्ये मोफत आरोग्य तपासणी

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आयुष हॉस्पिटलमध्ये रविवारी (दि.३०) सकाळी दहा ते दुपार चार वाजेपर्यंत महिला व बालकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मुलांच्या वाढीचे निरीक्षण,लसीकरण आणि रोगप्रतिबंधक उपाय, पौष्टिक आहार आणि आरोग्यदायी सवयी, आरोग्य समस्यांचे लवकर निदान करून बालरोग तजज्ञांकडून सल्ला दिला जाणार आहे. तसेच, महिला आरोग्य विषयक विविध समस्या पालक आणि काळजी घेणाऱ्यांना आधार स्त्रीरोग आरोग्य, प्रसुती काळजी, मासिक पाळीच्या समस्या, पेल्विक वेदना, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी तज्ज्ञ डॉ. गीतांजली गरिमा व आयुष हॉस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर बालरोग तज्ज्ञ डॉ.अनिल गोस्वामी आणि त्यांच्या टिमतर्फे करण्यात येणार आहे.

# जलजीवन योजना रखडल्या

## परतावा न मिळाल्याने ठेकेदार मेटाकुटीला

**| वेनगाव | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यात केंद्राची जलजीवन नळ पाणी योजना ही निधी अभावी रखडली आहे. त्यामुळे या योजनेतील १२३ पैकी ७१ योजना बंद पडल्या आहेत. तसेच, ज्या ५१ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत त्या कामाचे पैसे संबंधित ठेकेदारांना मळिालेले नाहीत. ते पैसे मळिविण्यासाठी ठेकेदार गेल्या काही महिन्यांपासून सबंधित विभागाकडे मागणी करत असून ते अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. शासनाच्या या उदासीन धोरणामुळे संबंधित ठेकेदारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.**

'जलजीवन मिशन' ही भारत सरकारची एक योजना आहे. त्याचा उद्देश २०१९ ते २०२८ या कालावधीत ग्रामीण भारतातील प्रत्येक घराला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. या मिशन अंतर्गत 'हर घर जल' हे लक्ष्य साध्य करण्यासाठी नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवठा करण्याचा हेतू आहे. २०२८ पर्यंत दररोज ५५ लिटर पाणी नियमितपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना राबवण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात १२३ गावांमध्ये जलजीवन नळपाणी योजना मंजूर झालेल्या आहेत. त्यातील प्रत्येक योजनेच्या अंदाज पत्रकानुसार




निविदा रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या कर्जत उपविभाग ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जलजीवन योजनेच्या गोषवारा यादीत कर्जत तालुक्यात एकूण १२३ मंजूर योजना आहेत. त्यातील ५१ योजनेतील कामे पूर्ण झालेली आहेत. तर, ४० योजनेतील कामे प्रगतीत दाखवण्यात आली आहेत. तसेच, या गोषवारा यादीत एकूण ३१ जलजीवन नळपाणी योजनेतील कामे बंद असल्याची माहिती दर्शवली आहे. परंतु, ज्या योजना पुर्ण झाल्या आहेत त्याचे पैसे संबंधित ठेकेदारांना मिळालेले नाही. तसेच, जी कामे प्रगतीत दाखविण्यात आली आहेत ती पैसे मिळत नसल्याने संबंधित ठेकेदाराकडून अपूर्णावस्थेत ठेवली आहेत. आणि उर्वरित योजना निधी अभावी बंद ठेवली आहेत, असे काही ठेकेदारांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, शासनाच्या उदासीन धोरणामुळेच या योजना बंद पडल्या आहेत, असे नाराजीचे सुर जनतेमधून देखील उमटत आहेत.

### योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये

ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे पाणी पोहोचवणे. प्रत्येक व्यक्तीला दररोज ५५ लिटर शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे. सुरक्षित आणि पुरेसे पिण्याच्या पाण्याची नियमित उपलब्धता सुनिश्चित करणे. दूषित पाण्याच्या स्त्रोतांवर लक्ष केंद्रित करून सुधारणा करणे.

> **जलजीवन योजनेअंतर्गत कर्जत तालुक्यात एकूण १२३ योजना मंजुर करण्यात आल्या आहेत. त्यातील काही कामे पुर्ण झालेली आहेत. जी कामे अपूर्णावस्थेत किंवा बंद आहेत ती ठेकेदार काम करत नसल्यामुळे बंद आहेत.**
> **–संतोष चव्हाण,** उपअभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा, राजिप उपविभाग कर्जत

### ठेकेदारांवर कर्जबाजाराचे संकट

कर्जत तालुक्यातील १२३ गावांमध्ये जल जीवन नळ पाणी योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यातील काही योजना पूर्ण झाल्या असून काही अपूर्णावस्थेत आहेत. त्यातील पुर्ण झालेल्या ५१ योजनांचे पैसे संबंधित ठेकेदारांना मिळाले नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. तसेच, जी ४० कामे प्रगतीपथावर दाखविण्यात आली आहेत ती कामे निधी अभावी रखडली असल्याचे देखील ठेकेदारांकडून सांगण्यात येत आहे. ही कामे पुर्ण करण्यासाठी काहींनी कर्ज काढून किंवा एखादी मौल्यवान वस्तू गहाण ठेवून कामे पूर्ण केली आहेत. गेल्या काही महिन्यांपासून केलेल्या कामांचा परतावा मिळण्यासाठी सबंधित विभागाकडे मागणी करत आहेत. परंतु, त्यांच्याकडून 'पैसे आले नाहीत' असे सांगण्यात येत आहे. काम केल्याचे पैसे मिळत नसल्याने कर्जबाराची संकट ओढावत आहे, असे संबंधित ठेकेदारांकडून सांगण्यात येत आहे.



## 'हर घर संविधान' उपक्रम

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित भारतीय संविधान दिवस बुधवारी (दि.२६) साजरा करण्यात आला. यावेळी 'हर घर संविधान' हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे पूजन व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थीनी सानिया जाधव हिने भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले. त्यानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची माणगाव परिसरात रॅली काढण्यात आली. तसेच, महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देशिका परिपत्रक महाविद्यालयाच्या परिसरात लावण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांसाठी पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन व ग्रंथालयात संविधानाचे वाचन करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांकडून माणगाव बस आगार येथे पथनाट्याचे आयोजन करण्यात आले हाते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी नेहा तुराई, स्वप्नील सकपाळ यांनी प्रमुख भूमिका बजावली.

# आदिवासी बांधवांचे उपोषण स्थगित

**| रसायनी | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कनाळ्रा हद्दीतील मोरटाका आदिवासीवाडी येथील दोन फार्महाऊस धारकांच्या वादात मागील २३ वर्षांपासून आदिवासींचा रस्ता अडकला आहे. त्यासाठी गणपत पवार व इतर आदिवासी बांधवांनीमंगळवार२५नोव्हेंबरपासून उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पनवेल यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसले होते. प्रांताधिकारी होऊन चंडक यांनी उपोषणकर्त्यांसोबत चर्चा करून ७ दिवसांत पनवेलचे गटविकास अधिकारी, अप्पर तहसीलदार व इतर संबंधित यंत्रणांमार्फत प्रत्यक्ष वस्तुस्थिती लक्षात घेऊन पुढील कारवाई करू, असे लेखी आश्वासन



दिले आहे. त्यांनतर आदिवासी बांधवांनी हे उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र, दिलेल्या मुदतीत योग्य ती कारवाई न झाल्यास कोकण आयुक्तांच्या कार्यालयासमोर आम रण उपोषण करण्याचा इशारा यावेळी उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

रायगड जिल्हा परिषदेकडून कनाळ्रा हद्दीतील मोरटाका आदिवासीवाडी येथील रस्त्याला ग्रामीण मार्ग क्रमांक २९६ चा दर्जा दिला आहे. तसेच, हा रस्ता व त्यावरील साकव दुरूस्तीसाठी शासकीय निधी मंजूर असतानाही शासकीय यंत्रणा मात्र हा रस्ता दुरुस्तीच्या कामात कुचकामी ठरल्याचे दिसत आहे. प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि या रस्त्याच्या शेजारी असलेल्या फार्महाऊस धारकांच्या आपसी वादामुळे आदिवासी समाजात दोन गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे मागील २३ वर्षांपासून येथील आदिवासी व स्थानिक ग्रामस्थांना रस्त्याचा प्रश्न प्रलंबित आहे. एकीकडे प्रशासकीय यंत्रणा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, तर परिसरातील स्थानिक राजकीय कार्यकर्ते मात्र या दोन बड्या फार्महाऊस धारकांच्या इशाऱ्यांवरून मलिदा खाण्यासाठी आदिवासींना एकत्रित येऊ देत नाहीत. उलट हे तथाकथित कार्यकर्ते आदिवासींच्या दोन्ही गटांना एकमेकांसमोर परस्पर विरोधी उभे करून रस्ता होऊ देत नसल्याचा आरोप उपोषणकर्ते गणपत पवार व इतर आदिवासींनी केला आहे. त्यामुळे हा रस्ता व साकव दुरूस्ती तात्काळ करावी, अशी मागणी आदीवासी बांधव व स्थानिकांकडून होत आहे.

## शशिकला जाधव यांचे निधन

**| खांब | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील भीम सेवा मंडळ व यशोधरा महिला मंडळ खांबच्या सभासद असणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षिका शशिकला कोंडीराम जाधव यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी शनिवारी (दि.२२) निधन झाले. त्या सामाजिक कार्यकर्ते मिलिंद जाधव यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, सुन, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे जलदानविधी व शोकसभा बुधवारी (दि.३) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# इंग्रजी वकृत्व स्पर्धेचे आयोजन

**| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |**

आशिर्वाद फाऊंडेशनतर्फे श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील श्री मोहनलाल सोनी विद्यालयात शुक्रवारी (दि.२१) इंग्रजी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा सातवी आणि आठवी अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषे बद्दलची भीती कमी करुन आवड कशी निर्माण करता येईल, तसेच वक्तृत्व कौशल्य, आत्मविश्वास, भाषिक अभिव्यक्ती आणि विचार मांडण्याची क्षमता विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात जनता शिक्षण संस्थे अंतर्गत असणाऱ्या बोर्ली मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यम भरडखोल, मेंडदी, आदगाव या




५ हायस्कूलमधील एकूण ३२ विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या वकृत्व स्पर्धेत एकूण तीन क्रमांक काढण्यात आले. त्यातील इ. सातवी गटात प्रथम क्रमांक स्वरा पाडलेकर, द्वितीय क्रमांक शृंगी किर तर तृतीय क्रमांक सर्वेश सुर्वे याने पटकावला. तसेच, इ. आठवीच्या गटात प्रथम क्रमांक सान्वी रहाटे, द्वितीय क्रमांक तनश्री गोविलकर, तर तृतीय क्रमांक भूमिका सोळंकी हिने पटकावला.

यावेळी आशिर्वाद फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश चव्हाण यांनी विशेष मार्गदर्शन केले. तसेच सदस्य- निखिल रळिकर, निशांत रळिकर, कुणाल माळवदे, कपिल सूर्यवंशी, राकेश तोडणकर, मयूर कविलकर, अक्षय पयेर हे उपस्थित होते.

# रस्ते सुरक्षा जनजागृती मोहिमेला प्रतिसाद



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

- **वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन**
- **नागरिकांची वाहतूक शिस्त पाळण्याची प्रतिज्ञा**

गव्हाण फाटा येथील वाहतूक विभागाने रस्ते सुरक्षा आणि वाहतुकीच्या शिस्तीसाठी महत्वाच्या ठिकाणी विशेष जनजागृती मोहीम राबविली. सिग्नल असलेल्या चौकांवर रिक्षाचालक तसेच अन्य विविध प्रकारच्या वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी आवाहन केले. त्याचप्रमाणे विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस ठाण्यातील पोलिसांशी समन्वय साधून नाकाबंदी करण्यात आली. त्यामध्ये मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कडक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत वाहतुकीची शिस्त पाळण्याची प्रतिज्ञा नागरिकांनी केली. त्यात दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर, चारचाकी वाहन चालवितांना सिटबेल्टलावणे, वाहनचालवितांना मोबाईलचा वापर न करणे,वाहतूक सिग्नलचे पालन करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे आदी नियमांना वाहनचालकांनी मान्यता दिली. तसेच, गव्हाणफाटा नाक्यावरील रिक्षाचालकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. या मोहिमेत सुरक्षित व नियमबद्ध वाहनचालकांना वाहतुक कोंडी टाळण्यासाठी सहकार्य, परवाशांशी सौजन्यपूर्ण संवाद आणि महामार्गावर परस्पर सहकार्याची भावना राखण्यावर महत्वपूर्ण भर देण्यात आला.

गव्हाणफाटा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन बडगुजर यांनी, गव्हाणफाटा वाहतूक शाखेने मागील तीन महिन्यांपासून अपघातांची संख्या कमी करण्यासाठी या विभागातील शाळा, कॉलेज आणि सामाजिक संघटना यांच्या सोबत जनजागृती उपक्रम राबविले आहेत. त्यामुळे हा वाहतूक पोलिसांचा विभाग केवळ वाहनचाकांवर दंडात्मक कारवाई करणारा न राहता, नागरिकांचे हित जपणारी आणि सामाजिक जबाबदारी पाड पडणारी संस्था म्हणून पुढे येत आहे. या उपक्रम ंमुळे रस्त्यावरील वाहनांची शिस्त सुधारून अपघातांची संख्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

**इंग्रजी शिक्षणासाठी आगळावेगळा उपक्रम** | **नवघर शाळेचा 'बँक ऑफ वर्ड' उपक्रम**

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी बोलणार फाडफाड इंग्रजी

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

राजिप शाळा नवघर येथे इंग्रजी शिक्षणासाठी एक आगळावेगळा आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. शाळेतील उपशिक्षिका शीतल पाटील गेल्या काही महिन्यांपासून 'बँक ऑफ वर्ड' नावाचा उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी शब्दसंपत्ती वाढत असून, स्पेलिंग पाठांतर, व्याख्या रचना आणि संवाद कौशल्य यामध्ये लक्षणीय सुधारणा होत आहे.

आजच्या ग्लोबल काळात मराठी शाळांपुढे इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व हे सर्वात मोठे आव्हान आहे. अनेक पालक, विद्यार्थी आणि समाजातील घटक यांना वाटते की, इंग्रजी माध्यम म्हणजेच उज्वल भवितव्याची गुरुकिल्ली असून मराठी माध्यम म्हणजे मागे राहण्याची शक्यता आहे. या चुकीच्या समजुतीमुळे अनेक मराठी शाळांमध्ये असुरक्षिततेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'बँक ऑफ वर्ड' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेत अमुलाग्र विकास होत आहे.



### इंग्रजी भाषेबद्दल आत्मविश्वास

'बँक ऑफ वर्ड' उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेबाबत आत्मविश्वास निर्माण होत असून, मराठी शाळांमध्येही दर्जेदार इंग्रजी शिक्षण शक्य आहे, हे नवघर शाळेने दाखवून दिले आहे. अशा उपक्रमांमुळे मराठी शाळांचे महत्त्व अधिक दृढ होईल, असा विश्वास शिक्षण क्षेत्रात व्यक्त होत आहे.

### असे शिकतात विद्यार्थी

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः हून एक कार्यसंघ तयार केला असून, बँकेच्या कार्यपद्धती प्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांचे 'शब्द खाते' तयार करण्यात आले आहे. दररोज विद्यार्थ्यांकडून इंग्रजी शब्दांचे पाठांतर करून घेण्यात येते आणि त्याची नोंद त्यांच्या खात्यावर केली जाते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक स्पर्धा आणि नव्या शब्दांच्या अभ्यासाची उत्सुकता निर्माण झाली आहे.

> **केंद्रप्रमुख अनिल राणे व शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक प्रमोद म्हात्रे यांच्या संकल्पनेतून मी हा उपक्रम तयार केला. शाळेमध्ये स्वामी विवेकानंद पैशांची बँक आहे. ज्यामध्ये विद्यार्थी खाऊचे पैसे वाचवून बचत करतात आणि विविध आर्थिक व्यवहार करतात. त्याचप्रमाणे 'बँक ऑफ वर्ल्ड' हा उपक्रम तयार करून इंग्रजी शब्दांची बँक तयार केली आहे. ज्यामध्ये विद्यार्थी रोज इंग्रजीचे विविध शब्द घेतात व त्यांचे पाठांतर करतात. पहिली ते चौथीचे विद्यार्थी खूप चांगल्या प्रकारे शब्द म्हणतात आणि इयत्ता पाचवी ते आठवीचे विद्यार्थी इंग्रजी शब्दांबरोबरच इंग्रजी वाक्य देखील तयार करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती जाऊन त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.**
> **– शितल पाटील,** उपक्रमशील शिक्षिका, रजिप नवघर शाळा.




### राशीभविष्य

- **मेष** : भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृषभ** : धार्मिक कार्यक्रमाचं समाधान लाभेल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. बाकी चिंता करू नये.
- **मिथुन** : कामासाठी बरीच धावपळ होईल. प्रवासात किंमती वस्तुंची काळजी घ्यावी. विचारांनं रहावं.
- **कर्क** : आपल्या कौशल्यावर अडचणीतून मार्ग निघेल. मान-सन्मान वाढीस लागेल. प्रकृती उत्तम राहील.
- **सिंह** : गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होईल. गृहसजावटीकडे ओढा राहील. स्थावर प्रश्नात तडजोड करावी.
- **कन्या** : इतरांचं सहकार्य गरजेचं ठरेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. दानधर्माकडे ओढा राहील.
- **तूळ** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. आर्थिक उत्कर्ष होईल.
- **वृश्चिक** : महत्त्वाच्या कामांबाबत सतर्क रहावं. आर्थिक व्यवहार विचारानं करावे. जुनी येणी वसुल होतील.
- **धनु** : मौल्यवान वस्तुंची खरेदी होईल. नव्या योजना मार्गी लागतील. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत.
- **मकर** : आर्थिक स्थिती उत्तम राहील. व्यवसायात नव्या संधी लाभणार आहेत. नवे करार मार्गी लागतील.
- **कुंभ** : अचानक अधिक खर्च करावा लागेल. मानसिक ताण वाढेल. कार्यक्षेत्रात अडचणी येऊ शकतात.
- **मीन** : कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण कराल. धनलाभाचे योग आहेत. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील.

### २८ नोव्हेंबर

दिनविशेष

- **१८९०** : ज्येष्ठ समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांचं निधन.
- **१९६७** : ज्येष्ठ क्रांतिकारक सेनापती बापट यांचं निधन.
- **२००४** : नाशिकच्या विमान कारखान्यात बनलेलं सुखोई-३० मार्कवेन हे विमान भारतीय हवाईदलात दाखल.
- **२०१३** : 'तहलका'चे मुख्य संपादक तरुण तेजपाल गोवा पोलिसांच्या तपास पथकासमोर हजर.
- **२०१५** : स्वदेशी बनावटीच्या अण्वस्त्रवाहू अग्नी-१ क्षेपणास्त्राची चाचणी.

### हाता-पायात गोळे येतात?

आरोग्यमंत्र

हातापायात गोळे येणं ही एक सामान्य समस्या असते. प्रत्येकालाच कधी कधी या वेदना सहन कराव्या लागत असतात. कधी कूस पालटतानाही पायात गोळा येतो तर कधी गोळा आल्यामुळे जागचं उठणंही अवघड होतं. वरकरणी पाहता हा अल्पकाळ टिकणारा त्रास असला तरी प्रचंड वेदनांमुळे ही पाच-सात मिनिटंही दरदरुन घाम फोडतात. नेमकं काय होतं यावेळी? नेमके कोणत्या कारणाने पायात क्रॅम्प येतात, याची माहिती घेऊ...



✻ शरीरातील पाण्याची पातळी कमी होणं हे पायात गोळे येण्याचे महत्त्वाचं कारण आहे. डिहायड्रेशनमुळे मांसपेशींवर दबाव निर्माण होतो आणि पायात गोळे येतात. ✻ हाइपोथायरॉइडिज्मने ग्रासलेल्या रुग्णांना वारंवार पायात गोळे येण्याचा त्रास होऊ शकतो. थकवा, अशक्तपणा ही यामागील महत्त्वाची कारणं असतात. ✻ रक्तातील शर्करेचं प्रमाण असंतुलित असल्यासही पायात गोळे येऊ शकतात. रक्तातील शर्करेचं प्रमाण वाढल्यास पायात गोळे येतात. पाय खूप दुखतात. ✻ काही औषधांच्या दुष्परिणाम स्वरुपात हा त्रास भोगावा लागतो. म्हणूनच वारंवार हा त्रास भोगावा लागत असेल तर डॉक्टरांना आपण घेत असलेल्या सर्व औषधांची माहिती द्यावी. ✻ अतिरिक्त व्यायाम हेदेखील यामागील कारण असू शकतं. ✻ शरीरात पोषक तत्त्वांची कमतरता असेल तर पायात गोळे येण्याचा त्रास संभवतो. विशेषत: पोटॅशियम, सोडियम आदी खनिजांची मात्रा कमी असेल तर पायात क्रॅम्प्स येतात.

### वनसंपदेने नटलेला केनिया

सफर देशांची

केनिया हा आफ्रिका खंडातला एक देश आहे. पूर्व आफ्रिकेत हा देश वसला आहे. नैरोबी ही केनियाची राजधानी. केनियामध्ये ६० पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात. इथले लोक एकापेक्षा जास्त आफ्रिकन भाषा बोलतात. केनियामध्ये शालेय शिक्षण मोफत दिलं जातं. पण इथली बरीचशी मुलं घरातल्या तसंच शेतीच्या कामांमध्ये मदत करत असल्याने शाळेत जात नाहीत. संगीत आणि गोष्टी सांगणं या दोन गोष्टींना केनियातल्या संस्कृतीत महत्त्वाचं मानलं जातं. केनियात राहणाऱ्या विविध समाजांनी गाणी, गोष्टी आणि कवितांमधून आपली संस्कृती पुढे नेली.

केनिया हा देश हिंदी महासागर आणि व्हिक्टोरिया तलावाच्या मध्ये असल्यामुळे व्यापार-उद्योगासाठी इथे सतत माणसांची ये-जा असायची. जगभरातून तसंच मध्य-पूर्वेतून लोक केनियामध्ये येत असत. यामुळे केनियामध्ये सांस्कृतिक वैविध्य पहायला मिळतं. विविध जातीधर्माचे, वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक इथे राहतात. माणसाचा उगम सर्वात आधी उत्तर केनिया आणि टांझानियामध्ये झाल्याचं शास्त्रज्ञांचं मत आहे. **(क्रमश:)**

### मुलांना शिस्त लावताना...

संगोपन

घरात लहान मुलं असतील तर सतत पसारा होत राहतो. सहाजिकच आईचा सगळा वेळ पसारा आवरण्यातच जातो. आईला मुलांसोबत वेळ घालवता येत नाही आणि तिची खूप चिडचिड होते. हा राग परत मुलांवरच निघतो. हा सगळा घटनाक्रम टाळण्यासाठी तुम्ही लहान वयापासूनच मुलांना शिस्त लावू शकता.

✻ पलंग नीट करणं, बेडशीट घालणं, कपडे जागेवर ठेवणं, काढलेली पुस्तकं पुन्हा जागच्या जागी ठेवणं, खेळणी व्यवस्थित ठेवणं अशी कामं मुलांना देता येतील. त्यांच्यावर ओरडू नका. त्यांना झेपेल अशी जबाबदारी द्या. दिलेलं काम पूर्ण केल्यानंतर कौतुक करा. कामात चुका झाल्या तरी समजून घ्या. ✻ स्वत:च्या कपड्यांची घडी करून ठेवणं, बूट-मोजे जागच्या जागी ठेवणं यासारखी कामं करताना सुरुवातीला मुलं कंटाळतील. कदाचित त्यांना पटकन जमणार नाही. पण थोडा संयम ठेवा. ✻ ही कामं करताना मुलांना कंटाळा येतो. अशा वेळी त्यांच्या आवडीची गाणी लावता येतील. हसतखेळत काम करायला शिकवता येईल. ✻ स्वत:ची कामं स्वत: करणाऱ्या मुलांचा आत्मविश्वास वाढतो. मोठी झाल्यानंतर ती जबाबदार होतात.

### पंचांग

**शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष शु. ८, चंद्रराशी : कुंभ, नक्षत्र : शततारका, योग : व्याघात, सूर्योदय ६.५६, सूर्यास्त ५.५७

### फॉरवर्डस

**झटकते रहना बीच बीच में आस्तीन साहब...**

**साँप छुपे होते हैं अक्सर अपनों के भेस में...!**

### भटकंती

फिरायला गेल्यावर थोडी फार खरेदी केली जाते. त्यातही परदेशवारी असेल तर जवळच्या लोकांसाठी तरी काही वस्तू घेतल्या जातात. स्वत:साठी थोडी खरेदी होते. पण पैसे नसल्यामुळे किंवा वस्तू बऱ्याच महाग असल्याने खरेदी टाळण्याकडे आपला कल असतो. पण तुम्हाला खरेदीची आवड असेल तर या टिप्स फॉलो करा.

✻ फिरायला जाताना दोन क्रेडिट कार्ड सोबत ठेवा. परदेशातल्या खरेदीवर कोणतंही शुल्क न आकारणारी कार्ड कॅरी करा. एका कार्डातला बॅलन्स संपला किंवा काही समस्या आली तर दुसरं कार्ड वापरता येतं. तसंच दुसऱ्या कार्डाबरच्या सवलतींचा वापरही करता येईल. **(क्रमश:)**

### शरीर कार्यक्षम ठेवायचं तर...

फिटनेस मंत्रा



कारकिर्दीत उंची गाठण्यासाठी, स्वप्नपूर्तीसाठी शरीराची साथ लाभणं आणि ही साथ लाभण्यासाठी फिटनेसचा मंत्र जपणं गरजेचं आहे. हे लक्षात घेऊन तुम्हीही फिटनेसचं उद्दिष्ट ठेवायला हवं. या उद्दिष्टपूर्तीसाठी काय करायला हवं याचं हे मार्गदर्शन.

✻ समजा तुम्हाला ३० किलो वजन कमी करायचं आहे. एवढं वजन एका झटक्यात कमी होणार नाही. त्यामुळे कंटाळू नका. आधी छोटं उद्दिष्ट ठेवा. सुरुवातीला एक ते दोन किलो वजन कमी करा. मग पुढे जा. ✻ जीमचे मेंबर झालात. आठवड्याचे सातही दिवस राबायचं ठरवलं. परंतु वर्षभरात सात वेळाही जीममध्ये न जाता अचानक आठवड्याचे सात दिवस घाम गाळायला सुरुवात केली की दमणूक होणारच. मग नको ते जीम असं होऊन जातं. त्यासाठी आठवड्यातून चार ते पाच वेळा जीममध्ये जा. दमवणारा व्यायाम करू नका. शरीराला व्यायामाची सवय होऊ द्या. ✻ फॅड डाएटच्या मागे लागू नका. विशिष्ट घटक आहारातून वर्ज्य करू नका. कॅलरींवर नियंत्रण ठेवा. प्रथिनयुक्त आहाराकर भर द्या. फळं, भाज्या, सॅलड असा पोषक आहार घ्या. ✻ वजन कमी करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्या. वेलनेस कोचच्या मदतीने डाएट आणि व्यायामाच्या योजना तयार करा.

### सॉरी आणि थँक यू

खेचाखेची

नेहमी सॉरी आणि थँक यू बोलायला शिका आणि एवढं करूनही...

समोरचा ऐकत नसेल, तर बिनधास्त कानाखाली वाजवा...

.

.

पुढचं पुढे बघितलं जाईल...

### वेगळं काही

'थँक्स गिव्हिंग डे' च्या निमित्ताने अमेरिकेतल्या लुईसाना प्रांतात राहणारं एक जोडपं घराची साफसफाई करत होतं. सफाईदरम्यान त्यांना जुनं लॉटरीचं तिकिट सापडलं. टीना आणि अ‍ॅर्नोल्ड एहरनबर्ग यांच्या आयुष्यात ही अनोखी घटना घडली. बऱ्याच दिवसांपूर्वी त्यांनी लॉटरीचं तिकिट खरेदी केलं होतं. गडबडीत हे तिकिट त्यांना कुठेच सापडलं नाही. अर्थात या लॉटरीचा निकालही घोषित झाला होता. पण विजेत्याने अजूनही रक्कम नेली नव्हती. हे तिकिट सापडल्यानंतर या जोडप्याने तातडीने लॉटरीची वेबसाईट उघडली. लॉटरी क्रमांक तपासून बघितला. त्यांना लॉटरी लागली होती. हे दोघं तातडीने 'लोटो लॉटरी'च्या कार्यालयात पोहोचले. त्यांनी कोट्यवधींची लॉटरी जिंकली होती.

### आकर्षक ऑफिस लूकसाठी...

लाईफस्टाईल

दोस्तांनो, ऑफिसमध्ये तुम्ही व्यवस्थित, नीटनेटकं असायला हवं. प्रोफशनल दिसायला हवं. प्रोफेशनलिझम जपायचं तर फॉर्मल्स मस्ट आहेत. अर्थात फॉर्मल्समध्येही तुम्ही कूल दिसू शकता, या संदर्भातील काही महत्त्वाच्या टीप्स...

✻ ऑफिसमध्ये फॉर्मल्स घालणं आवश्यक असलं तरी नेहमीच्या ग्रे किंवा काळ्या पँटऐवजी लिनन पँट ट्राय करा. पांढऱ्या रंगाच्या लिनन पँटवर पेस्टल रंगांचे शर्टस घालता येतील. यासोबत फॉर्मल बेल्ट घातला की काम झालं.

✻ नेहमीचा फॉर्मल लूक कधी कधी कंटाळवाणा वाटतो. छोट्याशा बदलाने हा कंटाळा सहज घालवता येईल. एखादी स्कीनी टाय तुमचा लूक सहज खुलवेल. अर्थात टायचा रंग तसंच त्यावरील प्रिंट पोशाखाला साजेशी असेल याची काळजी घ्यावी.

✻ कॉलेजमध्ये नाही तर ऑफिसमध्ये जायचंय हे लक्षात ठेवा. तुमच्या वयाला, पदाला शोभणारी बॅग विकत घ्या. लॅपटॉप तसंच इतर कागदपत्रं ठेवण्यासाठी लेदरची स्लिंग बॅग कॅरी करता येईल. अशी बॅग कोणत्याही पेहरावावर चालून जाईल.

✻ बूट स्वच्छ हवेत. ते पायांमध्ये नीट बसायलाही हवेत. सैल बूट शोभून दिसणार नाहीत. थोडा कूल लूक हवा तर लोफर्सवर मोजे घालू नका. पँटमधून टाच डोकावली तरी हरकत नाही. मात्र पायांचे तळवे स्वच्छ असायला हवेत.

## सुडोकू ३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | | | | | | १ | |
| | | | २ | ४ | ९ | | ५ | |
| | | ६ | | | ३ | | | ९ |
| | ९ | | ३ | | ८ | ५ | | ७ |
| | | | | | | | | |
| ६ | | ३ | ५ | | २ | | ४ | |
| २ | | | ४ | | | ३ | | |
| | ५ | | ८ | ३ | ७ | | | |
| | ३ | | | | | | ९ | १ |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ६ | ९ | ७ | ३ | ४ | ५ | ९ |
| ८ | ९ | ७ | ६ | ५ | ४ | २ | १ | ३ |
| ४ | ३ | ५ | १ | २ | ९ | ७ | ६ | ८ |
| ७ | ८ | ९ | २ | ४ | ६ | १ | ३ | ५ |
| ३ | ५ | १ | ७ | ९ | ८ | ६ | २ | ४ |
| २ | ६ | ४ | ३ | १ | ५ | ८ | ९ | ७ |
| ५ | ७ | २ | ९ | ८ | १ | ३ | ४ | ६ |
| ६ | ४ | ८ | ५ | ३ | २ | ९ | ७ | १ |
| ९ | १ | ३ | ४ | ६ | ७ | ५ | ८ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ३३



**आडवे शब्द :-**

१) म. गांधीजींचे आवडते भजन **** *** **** पतित पावन सीताराम
९) भांडण
११) ताकद
१२) स्तुत्य
१४) मधलीच, रहदारीची नव्हे अशी वाट
१६) कालवा, पाण्याचा पाट (हिं.)
१७) तालुक्याचे वसुलाचे काम, महत्व
१९) प्रफुल्लित
२०) विकण्याचा माल
२२) बक्षीसाचे पात्र
२३) सदोदित
२५) पचपचीत, बेचव
२९) लोणच्यातील द्रव मसाला
३०) चांदी
३१) कातडे
३२) हालचालींवर ठेवलेली नजर
३३) किंमत
३४) करमणूक
३६) विविध, अनेक प्रकार
३७) ढीग
३८) रक्षण करणारा
३९) कमळ, एका माजी पंतप्रधानांचे नाव
४०) गाजावाजा
४२) प्रत्येक दिवशी
४३) वसुमती
४५) विषमच्या विरुद्ध
४७) ओरखडा
४८) फक्त एकच
५०) वर-वधुची मिरवणूक
५२) मालक
५३) गरज
५४) पुरुन ठेवलेले द्रव्य
५६) चांदणी
५७) पाण्याने भरलेले
५८) एक श्वासरोग
५९) सिंह
६०) भोजनपात्र, थाळी
६१) रावण
६२) जगाचे कालचक्र
६३) वाट पाहणे.

**उभे शब्द :-**

२) दीवाभीत, अशुभ समजला जाणारा एक पक्षी
३) सुटकेचा रस्ता
४) योग्य, उचित
५) छोटी वस्ती
६) पुष्कळ
७) पुरुषांच्या नावापुढील एक बहुमानाचा शब्द
८) मुलांच्या भाषेत मांजर
१०) उणीव
१३) मृत्युदेवता
१४) चूक
१५) प्रफुल्लता
१६) नूतन
१८) निकट
२०) जहर
२१) कावळ्यांची ओरड, कावकाव
२२) खंदक, हाळ
२३) जाजम
२४) एकूणएक, सर्व
२६) तोंडातोंडी झालेला व्यवहार
३७) काम, नशीब
४१) फणसातील गर
४२) रोख रक्कम
४४) दक्ष
४६) राजा, सम्राट
४८) आदर्श विद्यार्थी
४९) तिसरा, परका
५१) अरण्याकडे जाणारा रस्ता
५२) आभाराचा एक शब्द
५३) स्वत:चे, आपले
५५) माफ
५६) राजा हरिश्चंद्राची पत्नी
५७) निवासस्थान
५८) वेगळा, निराळा
६०)छोटा दरवाजा

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विश्वचषक गाजवणाऱ्यांना मिळालं फळ

**।। दीप्ती शर्माने सर्वाधिक खाल्ला भाव ।। मुंबईने एका खेळाडूसाठी मोजले तीन कोटी**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला प्रीमिअर लीग २०२६ पर्वासाठी नवी दिल्लीत आज मेगा ऑक्शनमध्ये पाच फ्रँचायझींनी १८ खेळाडूंना कायम ठेवले आहे. ऑक्शनमध्ये १९४ भारतीय व ८३ परदेशी अशा एकूण २७७ खेळाडूंनी नोंदणी केली आहे. यापैकी फक्त ७३ खेळाडूंनाच करारबद्ध करता येणार आ-हेत आणि त्यातील २३ जागा या परदेशी खेळाडूंसाठी राखीव आहेत. सोफी डिव्हाईन, सोफी एक्लेस्टन, एलिसा हिली, अमेलिया केर, मेग लॅनिंग, दीप्ती शर्मा, रेणुका सिंग व लॉरा वॉलव्हार्ड्ट या खेळाडूंचा मर्क्यू खेळाडूंमध्ये समावेश केला गेला आहे.




महिला प्रीमिअर लीगच्या २०२६ साठी झालेल्या मेगा ऑक्शनच्या पहिल्या टप्प्यात मर्क्यू खेळाडूंमध्ये दीप्ती शर्माने सर्वाधिक भाव खाल्ला. दिल्ली कॅपिटल्सने तिला ५० लाखांच्या मुळ किमतीत आपल्या ताफ्यात घेतले होते, परंतु यूपी वॉरियर्सने मर्क्यूकार्ड वापरले. दिल्लीने त्यांच्यासमोर ३.२ कोटींचा प्रस्ताव ठेवला आणि यूपीने तो मान्य केला. महिला वर्ल्ड कप विजेत्या संघातील महत्त्वाची खेळाडू दीप्ती ही विश्व चषकामधील दुसरी महागडी खेळाडू ठरली. एलिसा हिली अनसोल्ड राहिली. सोफी डिव्हाइन २ कोटींत गुजरात जायंट्सच्या ताफ्यात दाखल झाली. एमेली केरी पुन्हा स्वगृही परतली आणि मुंबई इंडियन्सने तिला ३ कोटींत आपल्या संघात घेतले. रेणुका सिंगसाठी गुजरात जायंट्सने ६० लाख मोजले. यूप-ीने सोफी एक्लेस्टकनसाठी ठढच् वापरताना दिल्ली कॅपिटल्सकडून ८५ लाखांत तिला आपल्या ताफ्यात घेतले. मेग लॅनिंग यूपी वॉरियर्सने १.९० कोटी मोजले.लॉरा वॉलव्हाट्र्डटला दिल्लीने १.१ कोटीत आपल्या संघात घेतले. दुसऱ्या सेटमध्ये भारती फुलमाळीसाठी गुजरात जायंट्सने ७० लाख मोजले. फीबी लिचफील्ड १.२ कोटी घेत यूपी वॉरियर्सच्या ताफ्यात दाखल झाली. ऑस्ट्रेलियाच्या जॉर्जिय व्होलसाठी ६० लाखांची यशस्वी बोली लावली. स्मृती मानधनासह ती २०२६ मध्ये सलामीला खेळताना दिसेल. किरण नवगिरे ६० लाखांत यूपीकडून खेळणार.

वेस्ट इंडिजच्या चिने-ले हेन्रीसाठी यूपी व आरसीबी यांच्यात टक्कर पाहायला मिळाली. आरसीबीने तिच्यासाठी १.३ कोटी मोजले.

## मुंबई इंडियन्सचा अजब डाव

मुंबई इंडियन्स व दिल्ली कॅपिटल्स यांनी प्रत्येकी पाच खेळाडूंना कायम राखले आणि आता त्यांच्याकडे अनुक्रमे ५.७५ कोटी व ५.७ कोटी शिल्लक आहेत. मुंबई इंडियन्सने त्यांच्या शिल्लक रकमेतील ३ कोटी रक्कम एकाच खेळाडूसाठी वापरले.

३० लाख मुळ रक्कम असलेल्या श्री चरणीसाठी दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात चुरस रंगली. यूपी वॉरियर्सनेही यात उडी घेतली होती, परंतु दिल्ली शेवटपर्यंत या खेळाडूला आपल्या ताफ्यात घेण्यासाठी ठाम राहिले आणि १.३ कोटींत तिला आपल्या ताफ्यात घेतले. डहीशश उहरीरपळ ीं ऊ षी १.३ लीशिनुकत्याच पार पडलेल्या महिला वर्ल्ड कप स्पर्धेत चरण-ीने तिच्या गोलंदाजीने सर्वांना चकित केले. पहिलाच वर्ल्ड कप खेळणाऱ्या चरणीने ९ सामन्यांत १४ विकेट्स घेतल्या होत्या. २१ वर्षीय चरणी ही आंध्र प्रदेशच्या कडपा या गावातून येते.

नल्लापुरेड्डी श्री चरणी हिचा जन्म ४ ऑगस्ट २००४ रोजी आंध्र प्रदेशातील यार-कडपा जिल्ह्यातील वीरपुनायुनी पल्ली मंडळातील एर्रामल्ले गावात झाला. वयाच्या २० व्या वर्षी, ती भारतासाठी खेळणारी तिच्या जिल्ह्यातील पहिली खेळाडू बनली. ती एका सामान्य कुटुंबात वाढली. तिचे वडील चंद्रशेखर रेड्डी हे रायलसीमा औष्णिक वीज प्रकल्पात कर्मचारी म्हणून काम करतात. सहावीत असताना बॅडमिंटन खेळण्यास प्रोत्साहित झालेली चरणी खो-खो देखील खेळत होती. नंतर, स्मृती मानधना आणि युवराज सिंग यांच्या प्रे-रणेने ती क्रिकेटकडे वळली. तिचे काका किशोर कुमार रेड्डी यांनी सुरुवातीला तिला क्रिकेटचे प्रशिक्षण दिले. हळूहळू, तो प्रगती करत गेली आणि कठोर परिश्रम, कामगिरी आणि क्रिकेटची आवड याच्या जोरावर त्याने भारतीय अंडर-१९ संघात स्थान मिळवले.

## लक्ष्यने जिंकली ऑस्ट्रेलियन ओपन



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा स्टार शटलर लक्ष्य सेनने ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन २०२५ चे विजेतेपद जिंकले आहे. त्यानं अंतिम सामन्यात जपानचा दिग्गज बॅडमिंटनपटू युशी तनाकाचा पराभव केला. सेनने या अंतिम सामन्यात सरळ सेटमध्ये (२१-१५, २१-११) जेतेपद जिंकलं. यासह सेननं त्याचा जेतेपदाचा दुष्काळ संपवला. लक्ष्यचे या हंगामातील हे पहिले जेतेपद आहे. यासह, सेन या हंगामात इथक्र जेतेपद जिंकणारा दुसरा भारतीय ठरला. ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष एकेरी बॅडमिंटन सुपर ५०० स्पर्धेच्या अंतिम फेरीत, १३ व्या मानांकित लक्ष्यने सामना जपानच्या २७ व्या मानांकित युशी तनाकाशी झाला. लक्ष्यने पहिला सेट २१-१५ असा जबरदस्त जिंकला आणि नंतर दुसऱ्या सेटमध्ये त्याच्या प्रतिस्पर्ध्याला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. दुसरा सेट २१-११ असं जिंकून जेतेपद पटकावलं.

# डेव्हिस चषकात इटलीला जेतेपद

**। बोलोन्या । वृत्तसंस्था ।**

इटलीने डेव्हिस चषक स्पर्धेच्या फायनलमध्ये स्पेनला नमवत जेतेपदाची हॅट्ट्रिक नोंदवली. मॅटिओ बेरेट्टिनी व फ्लॅव्हिओ कोबोली यांनी एकेरीतील आपल्या लढती जिंकत स्पेनवर २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. या निर्णायक फायनलमध्ये इटलीचा स्टार खेळाडू जानिक सिनरने येथे खेळण्याऐवजी पुढील हंगामाची तयारी करणे पसंत केले होते. पण, येथे त्याला इटलीची गरजच भासली नाही. इटलीचे हे डेव्हिस चषकाचे एकूण चौथे आणि सलग तिसरे विजेतेपद आहे. यापूर्वी १९६८ ते १९७२ दरम्यान सलग पाच वेळा विजेतेपद पटकावणारा अमेरिका हा शेवटचा देश होता. जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असलेला लोरेन्झो मुसेट्टी देखील इटली संघात नव्हता. पण, या दोन्ही खेळाडूंशिवायही इटलीने बाजी मारली. ऑस्ट्रियाला उपांत्यपूर्व फेरीत आणि बेल्जियमला उपांत्य फेरीत पराभूत केल्यानंतर, बोलोन्या येथील सुपरटेनिस अरेनामध्ये इटलीने या आठवड्यातील आप-ले तिन्ही सामने २-० ने जिंकले. स्टार खेळाडूंच्या अनुपस्थितीत स्पेनलाही अव्वल मानांकित कार्लोस अल्कारेझशिवाय खेळावे लागले. अंतिम सामन्यात, मॅटिओ बेरेट्टिनीने पाब्लो कॅरेनो बुस्टाचा ६-३, ६-४ असा पराभव केला. त्यानंतर कोबोलीने ज्युम मुनारवर १-६, ७-६ (५), ७-५ अशी संघर्षपूर्ण मात करून निर्णायक विजय मिळवला. या आठवड्यात त्याने सलग तिसऱ्यांदा विजयी गुण मिळवून दिला. हा विजय मिळवताच कोबोलीने रॅकेट खाली टाकली आणि त्याच्या इटलीच्या सहकार्यांनी त्याला आनंदाने उचलून घेतले. डेव्हिस चषकात १९७६ मध्ये इटलीचे पहिले जेतेपदइटलीने १९७६ मध्ये प्रथम डेव्हिस चषक जिंकला होता, त्यानंतर २०२३ आणि २०२४ मध्ये मालागा येथे विजेतेपद मिळवले. यावेळी त्यांनी मायदेशात प्रथमच डेव्हिस चषक जिंकला आहे. सहा वेळा चॅम्पियन ठरलेला स्पेनचा संघ २०१९ नंतर प्रथमच अंतिम फेरीत खेळत होता.




# भारताला कसोटीत दीर्घकाळाची सुट्टी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२५ च्या शेवटच्या कसोटी मालिकेत भारतीय क्रिकेट संघाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. दक्षिण आफ्रिकेने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाला २-० ने लीन स्वीप केले. कोलकाता इथं खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून ३० धावांनी पराभव झाला. तर मालिकेतील दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं भारताचा ४०८ धावांनी पराभव केला. भारतीय संघ आता थेट पुढील वर्षी कसोटी क्रिकेट खेळणार आहे. भारतीय संघ सुमारे आठ महिन्यांपासून कसोटी क्रिकेटमधून रजेवर आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दारुण पराभवानंतर, भारतीय संघ पुढील वर्षी जूनमध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करेल. भारत जून २०२६ मध्ये अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळेल. मात्र, हा सामना २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग असणार नाही. अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळल्यानंतर, भारतीय संघ दोन महिन्यांनी श्रीलंकेत एक कसोटी मालिका खेळेल. ही दोन सामन्यांची कसोटी मालिका असेल, जी जागतिक कसोटी संघासाठी महत्त्वाची असेल.

## मुंबईच्या संघात सूर्यकुमारला स्थान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आगामी सय्यद मुश्ताक अली करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवचा मुंबईच्या संघात समावेश करण्यात आला आहे. शार्दूल ठाकूर मुंबईचे नेतृत्व करणार आहे.

रणजी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात सर्व संघांचे पाच साखळी सामने झाल्यावर आता मुश्ताक अली व त्यानंतर विजय हजारे ही देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धा खेळवण्यात येईल. मुंबईचा संघ हा मुश्ताक अली स्पर्धेचा गतविजेता आहे. अ-गटात मुंबईसह केरळ, छत्तीसगड, विदर्भ, आंध्र प्रदेश, रेल्वे, ओदिशा, आसाम अशा एकूण आठ संघांचा समावेश आहे. २६ तारखेला रेल्वेविरुद्धच्या लढतीने मुंबई आपल्या अभिनायास प्रारंभ करणार आहे. मुंबईचे साखळी सामने लखनऊ येथे होतील. मुंबईचा संघ शार्दूल ठाकूर (कर्णधार), अजिंक्य रहाणे, आयुष म्हात्रे, अंक्रिश रघुवंशी, सूर्यकुमार यादव, सिद्धेश लाड, सर्फराझ खान, शिवम दुबे, साईराज पाटील, मुशीर खान, सूर्यांश शेडगे, अर्थव अंकोलेकर, तनुष कोटियन, शम्स मुलानी, तुषार देशपांडे, इरफान उमैर, हार्दिक तामोरे.



## वेदा सावंतची रुपेरी कामगिरी

**मुंबई :** बारामतीत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने आणि कराटे-डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या तांत्रिक सहकार्याने पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत प्रबोधन गोरेगाव कराटे अकादमीच्या वेदाने रौप्यपदक जिंकण्याची किमया केली. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून प्रबोधन गोरे-गाव कराटे अकादमीत कराटेचे प्रशिक्षण घेत असलेल्या वेदाने यापूर्वी भूतान येथे झालेल्या दक्षिण आशियाई कराटे स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. या स्पर्धेत तिने कांस्यपदक पटकावले होते. २०२४ मध्ये झालेल्या स्पूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व केले होते.

### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२५

## पिंपरी चिंचवड, पुणे शहर, परभणी, रायगड, जालना, उस्मानाबादची विजयी घौडदौड सुरु

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पिंपरी चिंचवड, पुणे शहर, परभणी यांनी कुमारी तर कुमारी विभागात रायगड, जालना, उस्मानाबाद यांची विजयी घौडदौड सुरू ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएसशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे व राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ४१ वी कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी व आमदार चषक कबड्डी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी पिंपरी चिंचवड बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत सुरू असलेल्या कबड्डी स्पर्धेच्या साखळी सामन्यात पिंपरी चिंचवड़ संघाने उस्मानाबादचा पराभव केला. तर परभणी संघाने जळगाव संघावर ४७-३७ अशी मात करीत आपल्या गटात विजय मिळविला.



कुमारी विभागात रायगडने धुळे संघावर ५७-२९ अशी मात करीत विजय मिळविला. रायगडच्या अनन्या निर्मल व आदिती पानवलकर यांनी जोरदार खेळ करीत सामन्याच्या पुर्वार्धात दोन लोन व उत्तरार्धात दोन लोन लावत विजय मिळविला. मध्यंतराला रायगडकडे ३१-१३ अशी आघाडी होती. त्यांना रिया जोशी व गितिका म्हात्रे यांनी केलेल्या पकडींची सुरेख साथ मिळाली. धुळ्याच्या हंसिका सोनावणे व साक्षी गावडे यांनी तोकडा प्रतिकार केला. श्रध्दा सोनगडे व आश्विनी बोरसे यांनी पकडी केल्या.

**संविधान दिनाचे औचित्य साधत केला पराक्रम** | **डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करुन प्रवासाची सुरुवात**

# हिरेनची १०८ किलोमीटरची सायकल सवारी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावातील इयत्ता आठवीमध्ये शिकत असलेला १३ वर्षीय सायकलपटू हिरेन राम हिसाळले याने संविधान दिनाचे औचित्य साधत १०८ किलोमीटर अंतर सायकलवरून प्रवास केला. भारताचा तिरंगा झेंडा बांधून सायकल चालवण्याचा पराक्रम सायकलपटू हिरेन याने केला आहे. दरम्यान या सायकल फेरीमध्ये नेरळ गावातील अनेक तरुण हिरेनला साथ देण्यासाठी पहाटेपासून त्याच्या बरोबर होते.



संविधान दिन साजरा होत असताना नेरळमधील बाल सायकलपटू १३ वर्षीय हिरेन याने मोठी कामगिरी करण्याचा प्रयत्न केला. १०८ किलोमीटर अंतर पार करण्याचे नियोजन हिरेनने केले होते. पहाटे पाच वाजता नेरळ गावातून सायकल प्रवास सुरू करीत मोहाची वाडी येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून प्रवास सुरु केला. कल्याण-कर्जत राज्यमार्गने प्रवास सुरू केल्यावर माथेरान नाक्यावरील हुतात्मा चौक येथे असलेली हुतात्मा भाई कोतवाल, हिराजी पाटील यांच्या स्मारकाला अभिवादन केले. पुढे कर्जत हे १३ किलोमिटरचे अंतर पार करून हिरेनचा सायकल प्रवास सूर्यदेवाचे दर्शन झाले.

हिरेनने आपल्या सायकलवर तिरंगा झेंडा फडकवला आणि त्याचा सायकल प्रवास कर्जत चौक रस्त्याने पुणे मुंबई राष्ट्रीय महामार्ग वरून पळस्पे फाटा असा सुरू होत.

४० किलोमीटर अंतर पार करणाऱ्या हिरेनने पळस्पे फाटा ते खोपोली असा प्रवास मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग असा सुरू केला. खोपोली येथील शीळ फाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांना अभिवादन करून खोपोली येथून पळसदरी मार्गे कर्जत असा प्रवास करत असताना ऊन देखील चांगलेच जाणवत होते. मात्र, जिद्द आणि चिकाटी यांच्या जोरावर हिरेन याने नेरळ येथे सकाळी सव्वा दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे १०८ किलोमीटर अंतर पूर्ण झाल्यावर आपली सायकल फेरी पूर्ण केली.

हिरेनचे सोबत नेरळ गावातील अनेक तरुण सहभागी झाले होते, त्याचवेळी त्याला अनेक ठिकाणी त्याला शुभेच्छा देण्यासाठी तरुण भल्या पहाटे आणि सकाळच्या वेळी उपस्थित होते. त्या सायकल फेरीत ॲड. विपुल हिसाळके, ॲड. वैभव हिसाळके, वडील राम हिसाळले हे पूर्ण १०८ किलोमीटर प्रवासात सोबत होते.

## निवडक

### स्केटिंग स्पर्धेत लोहकरेला कांस्य

**मुंबई :** एण्डुरन्स फेडरेशन ऑफ इंडियातर्फे आयोजित एण्डुरन्स वर्ल्ड चॅम्पियनशिप आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत मुंबईच्या वैष्णवी जयेश लोहकरेने दोन कांस्यपदके जिंकण्याची कामगिरी केली आहे. पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेत वैष्णवीने ७ वर्षांखालील स्पीड क्वॉड गटात २ मिनिटे, १ मिनिट आणि २० सेकंद अशा तीन प्रकारात सहभाग घेतला. त्यातील २ मिनिटे आणि २० सेकंद या प्रकारात वैष्णवीने प्रत्येकी १ अशी एकूण २ कांस्यपदके पटकावली आहेत. वैष्णवी लोहकरे ही दादर येथील बालमोहन विद्यामंदिर शाळेची विद्यार्थिनी आहे. बोरिवलीच्या आयएनडीआरएस क्लबचे राज सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली ती स्केटिंगचा सराव करत आहे.



### पनवेलच्या ईशानने पटकावले सुवर्णपदक

पनवेल : ईशान कुंभार या पहिलीतील विद्यार्थ्याने पंजाबच्या अमृतसर येथे नुकत्याच झालेल्या थाय बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत सात ते नऊ वर्षे वयोगटात सुवर्णपदक पटकावले. अमृतसर येथे १६ वी राष्ट्रीय थाय बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्र, हैदराबाद, दिल्ली, छत्तीसगढ, तेलंगणा या राज्यातील तब्बल १५० खेळाडू सहभागी झाले होते. त्यात युनायटेड शुटोकॉन कराटे असोसिएशनच्या खेळाडूंनी घवघवीत यश मिळवले. ईशान पुंभारला रोहित थाली यांचे मार्गदर्शन लाभले. तो नवीन पनवेल येथील डीएव्ही स्कूलचा विद्यार्थी आहे. सुवर्णपदक पटकावल्याने ईशानची आशियाई स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



### रोहित शर्मा पुन्हा नंबर वन

**नवी दिल्ली :** आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या वनडे क्रमवारीत रोहित शर्मा पुन्हा अव्वल स्थानावर पोहोचला आहे. न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलने पहिला क्रमांक मिळाला. परिषदेने नुकतीच बुधवारी ताजी क्रमवारी जाहीर केली माजी कर्णधार रोहितने अखेरीस वनडे क्रमवारीत यादीत अव्वल क्रमांक पण त्याला गेल्या अव्वल क्रमांक गमवावा न्यूझीलंडच्या डॅरिल मागे टाकत अव्वल होता. क्रमवारीनुसार वनडेतील अव्वल ठरला आहे. स्थान गमावल्याने रोहितला आंतरराष्ट्रीय क्रिकेट (२६ नोव्हेंबर) आहे. भारताचा ऑक्टोबरच्या फलंदाजांच्या मिळवला होता. आठवड्यात हा लागला होता. मिचेलने त्याला क्रमांक मिळवला रोहित पुन्हा एकदा क्रमांकाचा फलंदाज



### राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रतीकला संधी

**कुडाळ :** नाशिक पंचवटी येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड केलेल्या आठ जणांच्या संघात येथील बॅ. नाथ पै फिजीओथेरपीचा विद्यार्थी प्रतीक वेझरे याचा समावेश आहे. तो राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेच्या संघात सहभागी होणार आहे. दरवर्षी अखिल भारतीय विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाचा संघ पाठविण्यात येतो. हा संघ पाठविण्यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघाची निवड ही राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील मुंबई, पुणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर, अमरावती अशा सहा विभागांतून करण्यात येते. श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय पंचवटी, नाशिक येथे झालेल्या बॅडमिंटन क्रीडा प्रकारामध्ये एकूण १२८ खेळाडू सहभागी झाले. त्यामधून प्रतिक वेझरे याची बॅडमिंटन संघात टॉप ८ मध्ये निवड झाली. त्याची खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२५ साठी निवड केली आहे.



### वैष्णवीची सुवर्णपदकांची हॅट्रिक

**सातारा :** हैदराबाद येथे झालेल्या २५ व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत वैष्णवी जगताप हिने सुवर्णपदकांची हॅट्रिक नोंदवली आहे. तिने ५० मीटर फ्रीस्टाईल, १०० मीटर फ्रीस्टाईल, ४ बाय १०० फ्रीस्टाईल रिले आणि ४ बाय १०० मेडले रिले या प्रकारांत सुवर्णपदक पटकावले, तर ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये रौप्यपदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथे झालेले राज्यस्तरीय पॅरा स्पर्धेत तिने ५० मीटर, १०० मीटर फ्रीस्टाईल आणि ५० मीटर बॅकस्ट्रोक या तिन्ही प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला होता. त्या कामगिरीच्या जोरावर तिची राज्य संघात निवड झाली होती. उडतरे गावची कन्या असलेले वैष्णवी ही जन्मतः दिव्यांग आहे. तिने जलतरण हे थेरपी म्हणून सुरू केले होते. आत्तापर्यंत तिने आशियाई पॅरा स्पर्धा २०२३, कॉमनवेल्थ स्पर्धा २०१८ यामध्ये देशाचे प्रतिनिधित्व केले आहे, तसेच ११ व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत ३० हून अधिक सुवर्णपदके मिळून दिली आहेत. नारायण परबती जगताप यांची नात असलेली व विनोद जगताप यांची कन्या असलेल्या वैष्णवीला राज्य शासनाने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देऊन गौरविले आहे. राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेतील कामगिरीचे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)